# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com   E-Mail : prajasattaknews24@gmail.com   Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026



❑ वर्ष - ३ रे ❑ अंक -१८९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २७ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


# गणपती बाप्पा मोरया!

## अमरावती जिल्ह्यात बाप्पाच्या स्वागताचा जल्लोष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

'गणपती बाप्पा मोरया'च्या गजराने आज संपूर्ण महाराष्ट्रात भक्तिमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले आहे. घराघरात, सोसायट्यांत, तसेच सार्वजनिक मंडळांत लाडक्या बाप्पांचे स्वागत करण्यात आले. रस्त्यापासून गल्लीबोळापर्यंत सर्वत्र मंगलध्वनी, ढोल-ताशे, फटाके आणि शंखनादाच्या गजराने वातावरण भारावून गेले. अमरावती जिल्ह्यातही गणेशोत्सवाची धूम पाहायला मिळाली.

नेहरू मैदान, सायन्सस्कोर मैदान आणि राजापेठ परिसरात गणेश मूर्ती विक्रीसाठी उभारण्यात आलेले स्टॉल कालपासून गजबजले होते. सकाळपासूनच भाविकांनी आपल्या आवडत्या गणरायाला घरी आणण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली. विशेषतः मातीच्या मूर्तींच्या खरेदीकडे लोकांचा ओढा अधिक दिसून आला. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याची जनजागृती झाल्यामुळे मातीच्या गणपतींना यंदा चांगला प्रतिसाद मिळाला.

श्रावणातील अनेक सणांपैकी गणेशोत्सव हा कोकणासह महाराष्ट्रासाठी अतिशय मोठा आणि महत्त्वाचा उत्सव मानला जातो. 'एक गाव एक गणपती' या संकल्पनेपासून ते भव्य-दिव्य सार्वजनिक मंडळांपर्यंत बाप्पाच्या स्वागताची तयारी काही



दिवसांपूर्वीपासून सुरू होती. आज सकाळपासून भाविकांनी गणेशमूर्ती घरी आणून विधीवत पूजा-अर्चना करून स्थापना केली. ढोल-ताशांच्या गजरात, फुलांच्या सजावटीत आणि दिव्यांच्या उजेडात प्रत्येक ठिकाणी बाप्पाचे आगमन पाहायला मिळाले. गणेशोत्सव काळात कोणतीही अडचण उद्भवू नये म्हणून पोलिस प्रशासनाकडून विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. शहरातील प्रमुख चौकात वाहतूक नियंत्रणासाठी अतिरिक्त पोलीस तैनात करण्यात आले आहेत. मंडप तपासणी, ध्वनीप्रदूषण नियंत्रणासाठी स्वतंत्र समित्या कार्यरत आहेत. तसेच महापालिकेकडून स्वच्छतेची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

अमरावती शहरातील प्रमुख मंडळांनी यंदा सामाजिक संदेश देणाऱ्या सजावटीची निवड केली आहे. कुठे पाणी बचतीचा संदेश दिला जात आहे, तर कुठे प्लास्टिक मुक्तीचे आवाहन केले जात आहे. काही मंडळांनी स्वातंत्र्यवीर सावरकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि संत परंपरेवर आधारित थीम रचून आकर्षण वाढवले आहे.

पुढील दहा दिवस भक्तगण गणपतीची मनोभावे पूजा-अर्चना करणार असून, घराघरात आरत्या, भजन-कीर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी वातावरण दुमदुमणार आहे. महिलावर्ग विविध प्रकारचे नैवेद्य, प्रसाद तयार करण्यात रमले आहेत, तर लहान मुले बाप्पाच्या सजावटीत उत्साहाने सहभाग घेत आहेत.


प्रशासनाकडून देखील मंडप तपासणी, ध्वनी प्रदूषण नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन आणि सुरक्षा यांसाठी विशेष बंदोबस्त करण्यात आला आहे. पोलिस, स्वयंसेवक आणि स्वयंसेवी संस्था मिळून हा सण सुरळीत पार पडावा यासाठी प्रयत्नशील आहेत.

गणेशोत्सव हा फक्त धार्मिक नाही, तर सामाजिक ऐक्य व एकात्मतेचे प्रतिक मानला जातो. दहा दिवसांच्या या उत्सवामुळे समाजात उत्साह, भक्ती आणि एकोपा यांचा संदेश पोहोचतो. 'गणपती बाप्पा मोरया,अशा जयघोषात प्रत्येक भक्ताच्या चेहऱ्यावर अपार आनंद झळकत आहे.अशा प्रकारे अमरावतीसह संपूर्ण महाराष्ट्र आज बाप्पामय झाला असून, पुढील दहा दिवस भक्ती आणि उत्साहाचा संगम अनुभवायला मिळणार आहे.

## युतीचा श्रीगणेशा! उद्धव ठाकरे सहकुटुंब राज ठाकरेंच्या 'शिवतीर्थ'वर दाखल; गणपतीचं घेतले दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

राज्यात गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहचलेला असताना राजकीय वतुर्ळातही नवीन युतीचा श्रीगणेशा झाल्याचं पाहायला मिळाले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या घरच्या गणपतीचं दर्शन घेण्यासाठी उद्धव ठाकरे सहकुटुंबासह शिवतीर्थ निवासस्थानी दाखल झाले. मागील अनेक दिवसांपासून ठाकरे कुटुंब पुन्हा एकत्रित येतानाचे चित्र राज्यात दिसत



आहे. मराठीच्या मुद्द्यावरून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यातील कटुता कमी होताना दिसली. त्यानंतर आज उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि रश्मी ठाकरे शिवतीर्थवर गणपतीचं दर्शन घेण्यासाठी दाखल झाले.

दरवर्षी राज ठाकरेंच्या घरी गणेशोत्सव साजरा केला जातो. या गणेशाचे दर्शन घेण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री पोहचतात. मागील वर्षीही एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरेंच्या घरच्या बाप्पाचं दर्शन घेतले होते. मात्र यंदा पहिल्यांदाच उद्धव ठाकरे राज ठाकरेंच्या घरी पोहचले आहेत. ठाकरे बंधू एकत्र यावेत अशी अनेक मराठी माणसांची आणि दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांची इच्छा होती. त्यात हिंदी भाषा सक्तीवरून दोन्ही ठाकरे बंधू यांच्यातील दुरावा कमी झाला. मराठी विजयी मेळाव्यात तब्बल २० वर्षांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकाच व्यासपीठावर आले होते, तेव्हापासून महापालिका निवडणुकीत मनसे-शिवसेना ठाकरे गट युतीची चर्चा सुरू होती.

## मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी गणरायाचे आगमन....



गणपती बाप्पाचे महाराष्ट्रात वाजत-गाजत स्वागत:मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानीही गणरायाचे आज आगमन, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यावर असलेलं सर्व संकट दूर व्हावेत अशी प्रार्थना केली.

## नागपूर - गोंदिया महामार्गाने ३ तासाचा प्रवास होईल फक्त सव्वा तासात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नागपूर**

नागपूर-गोंदिया द्रुतगती महामार्गास आणि त्यासाठीच्या भूसंपादनाकरिता प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. नागपूर ते गोंदिया सध्याच्या महामार्गाने पोहोचण्यासाठी साधारणपणे ३ तासांपेक्षा जास्त वेळ लागतो. या द्रुतगती महामार्गामुळे हे अंतर १५ कि.मी.ने कमी होऊन प्रवासाचा कालावधी सव्वातासावर येणार आहे.

हा महामार्ग नागपूर, भंडारा, गोंदिया जिल्ह्यांतील १० तालुके, ११५ गावांतून जात आहे. यात २६ उड्डाणपूल, प्राण्यांसाठी ८ अंडरपास, १५ मोठे व ६३ लहान पूल, ७१ कालवा क्रॉसिंग आदींचा समावेश आहे. तसेच गवसी, पाचगाव, ठाना, रोटरी, पांजरा, पालडोंगरी, लोहरी व सावरी अशा आठ ठिकाणी इंटरचेंज असणार आहे. हा महामार्ग



हे मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाच्या विस्ताराचा एक भाग असून, नागपूर ते गोंदिया दरम्यान ४ ते ६ लेनचा ग्रीनफील्ड एक्सेस-नियंत्रित मार्ग असेल. मुख्य मार्गाची लांबी साधारण १४५ कि.मी., त्याव्यतिरिक्त १४ कि.मी. कनेक्टर (तिरोडाला जोडणारा) आणि ४ कि.मी. बायपास (गोंदिया जवळ) या दोन्हींचा समावेश केल्यास एकूण प्रकल्प लांबी १६३ कि.मी. होतो.

## गणेशोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने रील स्पर्धेचे आयोजन

### प्रथम क्रमांकाला एक लाखांचे बक्षीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून यंदा गणेशोत्सवाला रील स्पर्धेच्या माध्यमातून देश-विदेशात नवे आयाम मिळणार आहेत. यंदा प्रथमच महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्यावतीने रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागासाठी २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन नाव नोदणी आणि रील अपलोड करायचे आहेत.

महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली



संपन्न होणारी ही स्पर्धा राज्यातील महसूल विभागीय स्तर , राज्यस्तर आणि महाराष्ट्राबाहेर व भारताबाहेरील खुला गट अशा तीन गटात होईल. रीलसाठी पर्यावरण संवर्धन, स्वदेशी, गडकिल्ले, संस्कृती, ऑपरेशन सिंदूर या थीम मध्यवर्ती ठेवून ३० सेकंद ते ६० सेकंदापर्यंत रील बनविणे अपेक्षित आहे.

महसूल विभागीय स्तरावरील विजेत्या स्पर्धकाला प्रथम पारितोषिक म्हणून २५ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक रुपये १५ हजार, तृतीय पारितोषिक १० हजार, उतेजनार्थ विजेत्यास ५ हजार अशा स्वरुपात पारितोषिक दिले जाईल. या स्पर्धेतील राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास १ लाख रुपये, द्वितीय पारितोषिक म्हणून ७५ हजार रुपये, तृतीय पारितोषिक म्हणून ५० हजार रुपये, उतेजनार्थ पारितोषिक म्हणून २५ हजार रुपये देण्यात येईल. तर महाराष्ट्र व भारताबाहेरील विजेत्या गटातील स्पर्धकाला प्रथम क्रमांकाचे १ लाख रुपये बक्षीस, द्वितीय क्रमांकासाठी ७५ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ५० हजार रुपये, उतेजनार्थ म्हणून २५ हजार रुपये देण्यात येतील. स्पर्धेची नोंदणीकरिता गुगल फॉर्म तयार करण्यात आला असून षळश्रालळीूाीलरळ.ीस या संकेतस्थळावर तसेच महामंडळाच्या सोशल मीडिया हँडल्सवर उपलब्ध आहे, असे दादासाहेब फाळके चित्रनगरीकडून कळिवण्यात आले आहे.

## गबाळं नाहीतर काय उचकायचंय ते उचका मी कोणाच्या बापाला घाबरत नाही - चित्रा वाघ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

भाजप नेत्या आणि विधानपरिषद आमदार चित्रा वाघ यांनी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या टीकेला उत्तर दिलं आहे. चित्रा वाघ यांनी जे बोलले ते मी ऐकलं पण मी कोणाच्या बापाला घाबरत नाही रोज मी अनेकांच्या शिव्या ऐकत आहे, असं उत्तर मनोज जरांगे यांना दिलं. मनोज जरांगे यांनी माझ्यावर टीका केली गबाळं उचकीन म्हणाले जे उचकायचं ते उचका, मी त्यांना घाबरणारी नाही, माझं नाव चित्रा वाघ आहे, असं त्या म्हणाल्या. चित्रा वाघ म्हणाल्या की, ज्या पद्धतीने मुख्यमंत्र्यांच्या आईवर टीका झाली ते महाराष्ट्राला पटणार नाही. आम्हाला तुमच्याबद्दल देखील आदर आहे तुम्ही एका समाजाच्या



आरक्षणासाठी मोठं काम करताय. आरक्षण जर कोण देणार तर देवेंद्र फडणवीसच देणार, असं देखील त्यांनी म्हटलं.

मनोज जरांगे यांनी त्यांचे शब्द मागे घेतले तर स्वागत आहे. केवळ पुनरावृत्ती होऊ नये एवढी अपेक्षा असं चित्रा वाघ यांनी म्हटलं. मी बाप्पाच्या आगमनाची वाट बघत होते म्हणून थांबले होते. ते जे बोलले ते मी ऐकलं पण मी कोणाच्या बापाला घाबरत नाही रोज मी अनेकांच्या शिव्या ऐकत आहे. दुसरे कोणी मुख्यमंत्री असते आणि त्यांच्या आईला कोणी बोललं असतं तरी आम्ही सहन केलं नसतं, असं चित्रा वाघ म्हणाल्या.

चित्रा वाघ पुढं म्हणाल्या की मनोज जरांगे यांनी माझ्यावर टीका केली, गबाळं उचकीन म्हणाले जे उचकायचं ते उचका, मात्र मी काही त्यांना घाबरणारी नाही माझं नाव चित्रा वाघ आहे. गेली २७ वर्ष मी राजकारणात, समाजकारणात काम करते आहे आणि आमदार मी आहे त्यांना माहीत नसेल. मी आमदार असले काय नसले काय जे काम करायला पाहिजे ते मी करत रहाणार, असंही वाघ यांनी स्पष्ट केलं.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज ठाकरेंकडे गणपती दर्शनाला जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यात अलीकडे झालेल्या चर्चेनंतर आता पुन्हा एकदा दोघांची भेट होणार आहे. राज ठाकरे यांच्या निवासस्थानी दरवर्षी दीड दिवसांचा गणपती असतो. आज मुख्यमंत्री फडणवीस गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी त्यांच्या घरी पोहोचणार आहेत. काही वेळापूर्वीच शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे हे सहकुटुंब राज ठाकरे यांच्या निवासस्थानी बाप्पाच्या दर्शनासाठी गेले होते. शिवतीर्थवरून उद्धव ठाकरे बाहेर पडताच मुख्यमंत्री फडणवीस तेथे पोहोचतील. उद्धव ठाकरे दुपारी १२.२५ वाजता राज ठाकरे यांच्या घरी पोहोचले होते. तब्बल दोन तास भेटीनंतर ते साधारण २.२५ च्या सुमारास शिवतीर्थवरून निघाले. आता फडणवीसांच्या भेटीमुळे पुन्हा एकदा राजकीय चर्चांना उधाण येणार आहे.

## संपादकीय ......

# गणरायाकडे इतकेच मागणे

अतिवृष्टी, निवडणुकीआधी दिलेल्या आश्वासनांमुळे राज्याच्या तिजोरीवर पडलेल्या ताणामुळे रखडलेली विकासकामे, स्थानिक स्वराज्य संस्थांची हालाखीची स्थिती, अनुदानांची प्रतीक्षा, शेतकर्यांचे प्रश्न, वाढती गुन्हेगारी, महिलांची असुरक्षितता, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान अशा कित्येक समस्या महाराष्ट्रासमोर आहेत. ही विघ्ने दूर करण्याची बुद्धी बाप्पांनी महाराष्ट्रातील नेत्यांना, सत्ताधार्यांना आणि राजकारण्यांना द्यावी, ही अपेक्षा जरी अतीच आहे, मात्र ही विघ्ने समोर असताना बुद्धिदात्या गणपती बाप्पांनी महाराष्ट्रातील राजकारण्यांनी आपले राजकीय वर्तन सुधारण्याची किंबहुना आपली वक्तव्ये नियंत्रणात ठेवण्याची बुद्धी द्यायला हरकत नाही. मात्र अशा बुद्धीचा स्वीकार राजकारण्यांकडून केला जाईलच याची खात्री नाही, राजकारणाचा संबंध निस्पृह बुद्धी आणि विवेकाशी नसून मुत्सद्दीपणाशी आणि डावपेचाशी असतो. आक्षेपार्ह, असंबंध बोलणे हा आजच्या राजकारणात अवगुण नाही तर ती राजकारणाची गरज बनली आहे. त्यामुळे बुद्धिवंत, समंजस साधीसरळ माणसे राजकारणापासून चार हात लांबच राहाणे पसंत करतात. मात्र त्यांच्या अशा उदासीन आणि राजकीय अनुपस्थितीचा गैरफायदा राजकारण्यांकडून घेतला जातो.

धार्मिक, राजकीय आणि सामाजिक तेढ निर्माण करणारी वक्तव्ये राजकारणी जाणीवपूर्वक करतात, राजकारणी गुन्हेगारांना पाठीशी घालतात, एवढेच नव्हे तर अनेकदा स्वत:च्या लोकप्रतिनिधीपदाच्या अहंकारातून कमकुवत माणसांना कॅमेर्यासमोर मारझोड करतात, या अशा वागण्याचे समर्थन करतात. सभागृहांचे अधिवेशन सुरू असताना धार्मिक, भावनिक गैरलागू मुद्दे समोर आणून महत्त्वाच्या प्रश्नांना बगल देणे, राजकारणाकडून जाणीवपूर्वक केला जाणारा हा नेहमीचाच प्रकार आता लोकांच्या अंगवळणी पडला आहे. त्यामुळेच अतिवृष्टीमुळे लोकांची उडालेली दैना, रस्त्यांचे पडलेले खड्डे, रखडलेल्या विकासकामांमुळे निर्माण झालेल्या इतर समस्या याविषयी आता कोणालाही काहीही वाटत नाही.

'हे असेच असते, असेच सुरू राहाणार' अशी निराशेची समजूत प्रत्येकाने करून घेतली आहे. निगरगट्ट राजकारण्यांच्या हे पथ्यावर पडत आले आहे. राजकीय वर्तनात पारदर्शकता, जबाबदारी आणि जनतेच्या हिताला प्राधान्य देणे हा आदर्शवाद कित्येक मैल मागे पडला आहे. भ्रष्टाचार, गटबाजीमुळे राज्याचे राजकारण रसातळाला गेले आहे. राजकारणी आता जनतेशी संवाद करत नाहीत तर त्यांना थेट धमकावतात, वेळप्रसंगी मारझोडही करतात. आपल्या चुकांचे लंगडे समर्थनही करतात. चांगल्या कामासाठी प्रसंगी पक्षभेद बाजूला सारून एकत्र येण्याची महाराष्ट्राची राजकीय परंपराही मागे पडली आहे. अविश्वास, भीती, कुरघोडीला राजकारणात ऊत आला आहे.

जरी बहुमताची सत्ता असली तरी मागील पाच वर्षात राज्यातील राजकीय अस्थिरता दिसून आलेली आहे, यामागे सत्तेच्या वळचणीला जाण्याची हतबलता महाराष्ट्रातल्या राजकारण्यांची अपरिहार्यता ठरली आहे. जातीय, धार्मिक समूहांच्या विघटीत राजकारणांमुळे महाराष्ट्राच्या ऐक्याचे तीन तेरा झाले आहेत. दुसरीकडे भ्रष्टाचाराचे आरोप, विशेषत: पायाभूत सुविधा प्रकल्प, जमीन व्यवहार आणि सरकारी निविदांमध्ये गैरप्रकार झाल्याचे आरोप आहेतच. माहितीच्या अधिकाराची गळचेपी, माध्यमांवरील दबाव, पारदर्शकतेचा अभाव, स्वायत्त यंत्रणांनी सत्तेचे पत्करलेले मांडलिकत्व यामुळे लोकशाहीवर प्रेम असलेला सामान्य माणूस पुरता निराश झाला आहे.

सामाजिक मुद्द्यांवरही राज्यातील स्थिती खूप काही चांगली नाही. महाराष्ट्राच्या विधानसभेत महिला आमदारांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. ज्या महिला प्रतिनिधी आहेत त्यांनाही पक्षादेशापलीकडे स्वत:चे लोकप्रतिनिधी म्हणून स्वतंत्र अस्तित्व नाही. आरक्षणासाठी लढणारे सामाजिक गट, आदिवासी, वंचित, पीडितांचे आर्थिक मागासलेपण, सामाजिक भेदभाव, विषमतेचे प्रश्न कित्येक वर्षांपासून कायम आहेत. हे प्रश्न राजकीय हत्यार म्हणूनच वापरले गेल्याचा महाराष्ट्राचा इतिहास आहे. त्याला सध्याचे बहुमतातील सरकारही अपवाद नाही. राज्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर न मिळालेला न्याय, या निराशेत भर घालणारा आहे.

शेतकरी आत्महत्या, पाणीटंचाई, पायाभूत सुविधांचा प्रश्न कायम आहे. कापसाच्या किमती, हमीभाव, शेतकर्यांवरील वाढते कर्ज, शिक्षण, रोजगाराच्या अपुर्या संधी, साधने, कौशल्यांना पुरेशी संधी न मिळाल्यामुळे तरुण निराश आहेत. जातीय, धार्मिक, सांस्कृतिक ध्रुवीकरणासाठीचे तणावपूर्ण राजकारण, निवडणूक प्रक्रियेवर होणार्या आरोपामुळे मतांची घसरणारी टक्केवारी आदी अनेक प्रश्न राज्यासमोर आहेत. सामाजिक संघटनांवर सत्तेच्या दबावामुळे लोकशाहीची ताकद असलेल्या सामाजिक चळवळी संपुष्टात येत आहेत. राजकारणाचे गुन्हेगारीकरण की गुन्हेगारीचे राजकारण असा प्रश्न पडावा इतकी स्थिती बिकट झाली आहे.

गुन्हेगारांना सत्तेकडून मिळणारे अभय आणि गुन्हेगारीला सत्तेकडून पाठीशी घातले जाण्याच्या प्रकारांमुळे ही स्थिती आणखी गंभीर झाली आहे. सुरक्षा आणि तपास यंत्रणांवरील राजकीय दबावामुळे लोकांच्या विश्वासाला तडा जात आहे. राजकीय नेत्यांकडून कायद्याचे राजकीय खेळणे झाल्यासारखी स्थिती आहे. न्यायाच्या तत्वावरील उडालेला विश्वास लोकशाहीवरील उडालेला विश्वास आहे. सूज आल्यासारखी शहरांची स्थिती असताना ग्रामीण भागातूनही विकासाच्या नावाखाली भूमिपुत्रांचे स्थलांतर होत आहे. अशा परिस्थितीत राज्यात पालिकांच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत. निवडणुकांच्या उत्सवाचे रुपांतर राजकीय उन्मादात होऊ नये, एवढेच साकडे श्रीगणेशापुढे घातले जाऊ शकते. उद्या आगमन होणार्या बाप्पांनी सामान्यांचे एवढेच गार्हाणे ऐकावे आणि त्यांना समस्यांतून दिलासा द्यावा.

# मातीच्या गणपतीची स्थापना करा

## अमरावती महानगरपालिकेचे पर्यावरणपूरक आवाहन



**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि. २७अमरावती–**
गणेशोत्सवाचे औचित्य साधून अमरावती महानगरपालिकेने शहरातील नागरिकांना पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे. यंदा गणेशमूर्तीसाठी मातीचा (शाडू) वापर करून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी पुढाकार घ्या, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

प्लास्टर ऑफ पॅरिस (झजझ) पासून तयार होणाऱ्या मूर्तींमुळे जलस्रोतांचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. त्यामुळे अशा मूर्तींच्या वापरास टाळा व सहज विघटन होणाऱ्या मातीच्या गणेशमूर्तींचा स्वीकार करा, असे आवाहन करण्यात आले आहे.

महानगरपालिकेने यासाठी विविध माध्यमांतून जनजागृती मोहीम राबवली असून, शाळा, महाविद्यालये, मंडळे आणि मूर्तिकार यांच्यासोबत समन्वयाने काम सुरू आहे.

याच अनुषंगाने शहरातील नेहरू मैदान येथे खास मातीच्या गणेशमूर्ती विक्रीसाठी स्टॉल्स राखीव ठेवण्यात आले असून, या स्टॉल्सवर फक्त मातीच्या गणेशमूर्तींचीच विक्री होणार आहे. मूर्तीकार संघटनेकडून याबाबत हमीपत्रही देण्यात आले आहे. या विक्री उपक्र माला महानगरपालिकेकडून प्रायोजित पाठबळही मिळाले आहे.

नेहरू मैदान येथील शाळेच्या बाजूस सुसज्ज अशा स्टॉल्स उभारण्यात आले असून, येथे महानगरपालिकेकडे नोंदणीकृत मूर्तीकारांकडून तयार करण्यात आलेल्या मातीच्या गणेशमूर्ती उपलब्ध आहेत. या ठिकाणी नागरिकांना मूर्ती खरेदी करताना अधिक विश्वास व गुणवत्ता मिळावी यासाठी महानगरपालिकेने माहिती फलकही लावलेले आहेत.

यावेळी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांनी स्टॉल्सना भेट देऊन विक्री व्यवस्थेचा आढावा घेतला आणि मूर्तीकारांशी संवाद साधला. त्यांनी नागरिकांना आवाहन केले की, या अधिकृत व नोंदणीकृत विक्रेत्यांकडूनच मातीच्या मूर्ती खरेदी कराव्यात आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवात सहभागी व्हावे.

महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी सांगितले की, शहराच्या स्वच्छता आणि पर्यावरण रक्षणासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. मातीच्या मूर्ती, घरगुती विसर्जन, आणि प्लास्टिकविरहित सजावट यास प्राधान्य द्या.

# डायबिटीसच्या रुग्णांनी भात कसा शिजवावा?






**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक**
डॉक्टर सांगतात की डायबिटीस असेल आणि भात खात असाल तर त्यातील स्टार्च काढून टाका. प्रोटीनयुक्त पदार्थांसोबत भात खा. आधी तांदूळ व्यवस्थित धुवून घ्या. नंतर एका भांड्यात पाणी उकळण्यासाठी ठेवा. पाण्याचं प्रमाण तांदळापेक्षा तीनपट जास्त हवं (ठशष). जेव्हा पाणी उकळू लागेल तेव्हा तांदूळ घाला आणि जवळपास ५ ते ६ मिनिटं शिजवा.नंतर त्यावर फेस किंवा पांढरे पदार्थ तरळू लागतील. यालाच स्टार्च म्हणतात. तांदूळ व्यवस्थित शिजेपर्यंत पाणी उकळू द्या. नंतर गॅस बंद करून उरलेलं स्टार्टचं पाणी गाळून घ्या. नंतर झाकण ठेवून वाफेवर १० मिनिटं ठेवा. हा पौष्टीक भात तुम्ही नेहमी खाऊ शकता. असा हेल्दी भात खाल्ल्यानं तुमचं वजनही नियंत्रणात राहील किंवा ही प्रक्रिया तुम्हाला किचकट वाटत असेल तर तुम्ही ब्राऊन राईस खाऊ शकता.

# मिरचीतील पांढरी माशी व फुलकिडींच्या नियंत्रणासाठी करा 'हे' कमी खर्चाचे जैविक उपाय

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक**
भाजीपाला पिकांत रसशोषक किडी व फळ पोखरणाऱ्या अळीच्या प्रादुर्भावामुळे पिकांचे ३० ते ४० टक्के नुकसान होऊ शकते.त्याशिवाय रासायनिक कीटकनाशकांचा अनावश्यक वापर केल्यास भाजीपाल्यावर कीटकनाशकांचा अंश राहू शकतो व त्याचे दुष्परिणाम होतात. त्यामुळे पिकाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी पिकाच्या सुरवातीपासून एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंब करावा.

मिरची या पिकात फळ पोखरणारी अळी, फुलकिडे, पांढरी माशी, कोळी इत्यादी किडी मोठ्या प्रमाणात नुकसान करतात. यासाठी सोपे आणि कमी खर्चाचे उपाय पाहूया

असे करा जैविक उपाय:

ह मिरची हे पीक विविध किडींना फार संवेदनशील असल्यामूळे अगदी रोपवाटीकेपासून ते रोपलागवडीच्या नंतर शेवटच्या तोडणीपर्यंत निरनिराळ्या टप्प्यात काळजी घेणे आवश्यक आहे.

ह मिरचीच्या रोपावर हलकेसे पाणी शिंपडल्यास फुलकिडीचा प्रादुर्भाव कमी होतो.

ह पिकाची फेरपालट करावी. सलग फक्त मिरचीचे पीक घेणे टाळावे.

ह मिरची पिकासोबत ४:१ या प्रमाणात चवळी, कोथिंबीर यांचे आंतरपीक घ्यावे.

ह झेंडू या सापळा पिकाची ४५ दिवसाची रोपे १०० झाडे प्रति एकरी लावावीत.

ह कीडग्रस्त फळे तोडून आतील अळीसह नष्ट करावे, तसेच शेत तणमुक्त ठेवावे.

ह पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी १०-१२ पिवळे चिकट सापळे व फुलकिड्यांसाठी निळे १०-१२ चिकट सापळे प्रति हेक्टरी लावावेत.

ह फळ पोखरणाऱ्या अळीच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध सापळे प्रति हेक्टरी लावावेत.

ह शेतात पक्षांना बसण्यासाठी एकरी १० पक्षीथांबे लावावेत जेणेकरून पक्षी त्यावर बसून अळ्या टिपून खातील.

ह सुरवातीच्या अवस्थेत रासायनिक किटकनाशकाचा वापर टाळावा. त्यामुळे ढालकिडा, क्रायसोपा, सिरफिड माशी, भक्षक ढेकूण या मित्र कीटकांचे संरक्षण होऊन हानिकारक किडीचे नैसर्गिकरित्या व्यवस्थापन होईल.

ह फळ पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी ट्रायकोग्रामाची अंडी ५०००० प्रति हेक्टरी शेतामध्ये सोडावीत (३ ते ४ ट्रायकोकार्ड).

ह फळ पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी एचएएनपीव्ही २५० एलई ५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून सायंकाळी फवारणी करावी.

ह पाच टक्के निंबोळी अर्काची किंवा अ‍ॅझाडीरॅक्टीन ३०० पीपीएम ५० मिली प्रति १० लिटर पाण्यातून प्रतिबंधात्मक फवारणी करावी.

ह वातावरणात आर्द्रता असल्यास बिव्हेरिया बॅसियाना १ टक्के डब्ल्यूपी १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.

ह रासायनिक कीटकनाशकाची फवारणी किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतर हवारंवार एकाच कीटकनाशकाची फवारणी न करता आलटून पालटून करावी.

विदर्भ प्रजासत्ताक **कृषी विशेष**




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
शाडू मातीच्या आकर्षक गणेश मूर्ति विक्रीसाठी उपलब्ध
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# ५६ प्रकल्पांमधील जलसाठा ७७ पोहोचला टक्क्यांवर

## सततच्या पावसाने जिल्ह्यातील प्रकल्प साठ्यामध्ये झाली वाट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**
मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने जिल्ह्यातील ५६ प्रकल्पातील पाणीसाठा हा (८०९.७९ दलघमी) म्हणजेच ७७.३२ टक्के वाढला आहे. मागील आठवड्यात तो ५२ टक्क्यांवर होता. आता तो ७७ टक्क्यांच्या वर गेला आहे. दरम्यान सर्वात मोठ्या अप्पर वर्धा धरणाचा जलसाठा हा ८७.८३ टक्क्यांवर पोहोचला आहे.

मागील वर्षी जिल्ह्यात झालेल्या संततधार तसेच प्रकल्प क्षेत्रातील पावसामुळे १ मोठा प्रकल्प, ७ मध्यम आणि ४८ लघु अशा ५६ प्रकल्पातील जलसाठ्यात वाढ झाली. तसेच यातील बरेच प्रकल्प ओव्हरफ्लोही झाले होते. यंदा उन्हाळ्याची तीव्रता वाढली होती.

बाष्पीभवनामुळे या ५६ प्रकल्पांचा जलसाठा कमी झाला. त्यातील ४८ लघु प्रकल्पापैकी २७ लघु प्रकल्प कोरडे पडले होते. या प्रकल्पांवर अवलंबून असलेल्या गावांवर पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. मात्र, मागील महिन्यासह या महिन्यात सुरू असलेल्या पावसामुळे जलसाठ्यात वाढ झाली आहे.

जिल्ह्यातील सर्व ५६ प्रकल्पांमध्ये आजघडीला ७७.३२ टक्के जलसाठा आहे. यामध्ये जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या अप्पर वर्धा घरणाचा पाणीसाठा हा (४९५.३८ दलघमी) म्हणजेच ८७८३ टक्के आहे.

तसेच सात मध्यम प्रकल्पात (१५०.५३ दलघमी) ५८.७५ टक्के जलसाठा आहे. ४८ प्रकल्पात (१६३. ८८ दलघमी) अर्थात ७२.१९ टक्के जलसाठा आहे. यातील मध्यम प्रकल्प असलेल्या शहानूर या प्रकल्पाचे दोन दरवाजे ५ सेंमीने तर पूर्णाचेही दोन गेट १० सेंमीने उघडून पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील सर्व प्रकल्पांची स्थिती (टक्क्यांमध्ये)अप्पर वर्धा ८७८३, शहानूर ८१.४१, चंद्रभागा ८९.१७, पूर्णा ७५.१३, सपन ८४.१२, पंढरी २५.२०, बोडर्डी नाला २४.८३, ४८ प्रकल्पात ७२.१९ टक्के जलसाठा

# हंतोडा गावात लंम्पी आजाराचे थैमान

## लंम्पी आजारांवर उपचार न केल्यास जनावरे शासकीय कार्यालयात सोडू

### संत्यविजय उंबरकर उपसरपंच हंतोडा यांचा प्रशासनाला इशारा

**दि.२७अंजनगाव सुर्जी**
अंजनगाव सुर्जी तालुक्यातील हंतोडा येथे लंम्पी आजाराचे थैमान घातले असून या आजाराने हंतोडा गावातील ३० ते ४० पेक्षा जास्त गुरांना आजाराने गाठले आहे. सध्या शेतीच्या पिकांसाठी शेतकऱ्यांना कर्ज काढून पिके उभी केली असून शेतकऱ्यांजवळ पैसा नसताना या भयानक लंम्पी आजाराने थैमान घातले असल्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. हंतोडा हे गाव विहीगाव येथील पशू संवर्धन दवाखाना अंतर्गत येत असुन हंतोडा येथे लंम्पी आजार असलेले जनावरे घेऊन जाणे शक्य होत नाही त्यामुळे पक्षूपालकाना खाजगी डॉक्टरांना खर्च परवडत नसल्याने अनेक आजारग्रस्त जनावरांवर उपचार झालाच नसल्यामुळे हा संसर्गजन्य आजार गावातील इतर जनावरांवर पसरतं आहे.मागील वर्षी लम्पी आजाराने थैमान घातला होता. तालुक्यामध्ये यावर्षी देखील या आजाराने शिरकाव केल्याचे दिसुन येत आहे. तालूक्यात हंतोडा गावात लंम्पि सदृश्य आजार असल्याचे निदर्शनास येत असुन अनेक गुराना आजारांनी गाठले आहे.धक्कादायक बाब म्हणजे एकीकडे साथ रोग वाढत असताना पशुवैद्यकीय अधिकारी याठिकाणी फिरकले नसल्याचा आरोप संत्यविजय उंबरकर उपसरपंच यांनी केला आहे.हंतोडा येथील गुरांच्या शरीरावर पूर्णपणे गाठी झालेल्या आहेत.अनेक जनावरांनी चारापाणी खाणेपिणे सोडले आहे.विहीगाव येथील पशुवैद्यकीय डॉक्टरांना हंतोडा येथे उपचारासाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी संत्यविजय उंबरकर उपसरपंच यांनी प्रशासनाकडे केली आहे. हंतोडा गावातील लंम्पी ग्रस्त उपचार अभावी गुरे मृत्यूमुखी पडल्यास ती मरण पावलेली गुरे शासकीय कार्यालयात टाकुन देण्यात येईल याची सर्व जबाबदारी स्थानिक प्रशासनाची राहील असा इशारा हंतोडा येथील उपसरपंच संत्यविजय उंबरकर यांनी दिला आहे.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on


Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २७ ऑगस्ट २०२५ शहर/ग्रामिण

# महाभारत कालीन साक्ष देणारा श्री क्षेत्र वायगावचा सिद्धिविनायक पांडवांच्या पदस्पर्शाने पावन झालेले तीर्थक्षेत्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७वायगाव** भातकुली तालुक्यातील श्री क्षेत्र वायगाव हे गाव धार्मिक व ऐतिहासिक अशा दुहेरी महत्त्वाने ओळखले जाते. येथील उजव्या सोंडेची अद्भुत गणेशमूर्ती आजही लाखो गणेशभक्तांचे श्रद्धास्थान आहे. भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून पौर्णिमेपर्यंत दहा दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवात दररोज अन्नदान, ज्ञानदान, भजन, कीर्तन, हरिपाठ यासारख्या धार्मिक उपक्रमांचे आयोजन केले जाते.

महाभारतातील विराट पर्वात पांडव अज्ञातवासात असताना जिल्ह्यातील चिखलदरा परिसरात आले होते.परतीच्या वेळी त्यांनी वायगाव येथील या गणेशमूर्तीचे दर्शन घेतले व अज्ञातवासाची अखेर केली, अशी आख्यायिका सांगितली जाते. या घटनेमुळे या मूर्तीला पौराणिक व ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. सहा शतकांपूर्वी वायगाव परिसरात झालेल्या खोदकामात ही मूर्ती सापडली. मुघल आक्रमणाच्या काळात मूर्ती भंजकांच्या भीतीमुळे ही मूर्ती भूमिगत ठेवण्यात आली होती. अचलपूर, दारापूर, खोलापूर आदी ठिकाणी मुघलांचे ठाणे असल्याने वायगावातील मूर्ती दीर्घकाळ लपवून ठेवण्यात आली होती. अखेर इंगोले कुटुंबाच्या घराजवळ ही मूर्ती सापडली आणि वाडारूपी मंदिरात तिची प्रतिष्ठापना करण्यात आली. कालांतराने गणेशभक्तांची वाढती गर्दी लक्षात घेता इंगोले कुटुंबाने भक्तांच्या सुविधेसाठी ट्रस्टची स्थापना केली. कुटुंबातील लोकांनी स्वतःची शेती देऊन मंदिर उभारले. सध्या या मंदिराचे व्यवस्थापन इंगोले व पाटील कुटुंबातील सदस्यांकडे अणून ट्रस्टचे अध्यक्ष विलास तुकाराम इंगोले आहेत. मंदिरात वर्षातून दोनप्रमुख उत्सव साजरे केले जातात. भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून पौर्णिमेपर्यंत – १० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवात – दररोज अन्नदान, ज्ञानदान, भजन, – कीर्तन, हरिपाठ यासारख्या धार्मिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्याचबरोबर गणेश जयंती उत्सवात हजारो भक्त महाराष्ट्र, मध्य प्रदेश तसेच शेजारील दर्शनासाठी वायगावला येतात.

## सिद्धिविनायक मूर्तींचे वैशिष्ट्य, सांस्कृतिक परंपरेची साक्ष

उजव्या सोंडेची अद्वितीय गणेशमूर्ती, उजव्या बाजूस सिद्धी व डाव्या बाजूस रिद्धी, पायावर पद्म व शंख चिन्ह, कोरलेले हातातील माळ व मोदक, ऐहिक जीवनातील समृद्धीचे प्रतीक, उत्तरायण व दक्षिणायन या दोन्ही संक्रांतीला सूर्योदयाची पहिली किरणे थेट मूर्तीवर पडतात. मुंबईनंतर महाराष्ट्रात केवळ वायगाव येथेच आहे. या मदिरातप्रमुख उत्सव साजरे केले जातात. भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून पौर्णिमेपर्यंत १० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवात दररोज अन्नदान, ज्ञानदान, भजन, कीर्तन, हरिपाठ यासारख्या धार्मिक अशी अद्वितीय सिद्धिविनायक मूर्ती असल्याने या तीर्थक्षेत्राचे महत्त्व अपार आहे. इतिहास, आख्यायिका आणि भक्तिभाव या तिन्हींचे संगम झालेले वायगाव सिद्धिविनायक मंदिर भाविकांना केवळ श्रद्धेचा आधारच देत नाही, तर महाभारताच्या काळातील सां संस्कृतिक परंपरेची ही साक्ष देत.

## राजकमल उड्डाणपुलाच्या स्ट्रक्चर ऑडिटनंतर

# वाहतूक बंदीचा निर्णय झाला, पण पर्यायी व्यवस्था का केली नाही?

## – काँग्रेसचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

शहराची लाईफ लाईन समजल्या जाणाऱ्या राजकमल रेल्वे उड्डाणपुलाचा प्रवेश २४ ऑगस्ट रोजी मध्यरात्री तडकाफडकी बंद करण्यात आला. सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलिस विभाग व महानगरपालिकेने संयुक्त आदेश काढून पुलावरील वाहतूक रोखली. मात्र, कोणतीही पर्यायी व्यवस्था जाहीर न करता हा निर्णय घेतल्याने शहरातील नागरिक, व्यापारी व प्रवाश्यांना प्रचंड गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अचानक झालेल्या या बंदीमुळे बाजारपेठेतील खरेदीत अडथळा निर्माण झाला असून, नेहरू मैदान व गांधी चौकातील गणेशमूर्ती विक्री बाजारपेठ प्रभावित झाली आहे. रुख्मिणीनगर, रेल्वे स्टेशन, मध्यवर्ती बसस्थानक, जयस्तंभ चौक या महत्त्वाच्या मार्गांवर प्रचंड मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या प्रवाशांनाही बसस्थानक व



रुग्णालयांकडे जाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे.शहर काँग्रेसने या निर्णयाचा निषेध नोंदवत प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. काँग्रेसचे माजी नगरसेवक मुन्ना राठोड, किशोर बोरकर, समीर जंवजाळ, वैभव देशमुख, अनिकेत ढंगरे व योगेश बुंदीले यांनी सांगितले की, राजकमल पुलाबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व रेल्वे विभागाला अनेक वर्षांपासून माहिती होती. दोन महिन्यांपूर्वी पुलावरील जडवाहतूकही थांबवण्यात आली होती. तरीही नवे बांधकाम सुरू करण्यासाठी शासनाला कोणताही प्रस्ताव पाठविला गेला नाही. त्यामुळे पुलाच्या बांधकामास मंजुरी मिळाली नसल्याचे स्पष्ट झाले आहे.काँग्रेस नेत्यांचा प्रश्न आहे की, हा पूल पडण्यास किती महिने व नव्या पुलाच्या बांधकामास किती वर्ष लागतील? कारण यापूर्वी राजापेठ उड्डाणपुलाचे काम तीन वर्षे उशिरा पूर्ण झाले. चित्रा चौक–वलगाव उड्डाणपुलाचे काम गेली सात वर्षे रेंगाळत आहे. अशा अनुभवांवरून राजकमल पुलाचे कामही लांबणार अशी भीती व्यक्त होत आहे.शहर काँग्रेसने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही गंभीर टीका केली. शहरातील इतक्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे पालकमंत्र्यांनी दुर्लक्ष केले. पुलाच्या पाडकाम व नव्या बांधकामाच्या कालावधीबाबत तातडीने सार्वजनिक खुलासा करावा. अन्यथा काँग्रेस जनहितासाठी तीव्र आंदोलन करेल, असा इशारा काँग्रेस नेत्यांनी दिला आहे.–

# अमरावती पोलिसांमार्फत यवतमाळतील वाहनधारकांना नोटीस

## यवतमाळच्या वाहनधारकांमध्ये खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २७यवतमाळ :**

अमरावती वाहतूक पोलिसांनी यवतमाळ जिल्ह्यातील शेकडो वाहनधारकांची वाहने 'ओव्हर स्पीड' असल्याने त्यांचे वाहन चलान केले. या संदर्भात अमरावती पोलिसांनी लोक अदालतमध्ये उपस्थित राहण्याची नोटीस या वाहनधारकांना पाठवल्याने खळबळ उडाली आहे. महामार्गावर अनेकदा वाहतूक पोलीस दिसणार नाही अशा पद्धतीने उभे राहून, ओव्हरस्पीड वाहनाचे फोटो काढून, त्यांना इ चलान पाठवतात. ही रक्कम पूर्वी एक ते दोन हजार इतकी असायची. आता त्यातही वाढ झाली आहे. यवतमाळच्या वाहनधारकांना अमरावती प्रवासादरम्यान हा अनुभव नेहमीच येतो.यवतमाळून अमरावती येथे जाणाऱ्या वाहनधारकांना अमरावती शहरातील वैष्णव देवी रोड व वेलकम टी पॉईंट परिसरात टार्गेट केले जाते. यवतमाळ जिल्ह्यातील (एमएच–२९) वाहनांवर मोठ्या प्रमाणात ओव्हर स्पीड या कारणावरून दंड आकारण्यात आले आहेत. यातील शेकडो वाहनधारकांना नुकत्याच लोकअदालतमध्ये हजर राहण्याची नोटीस प्राप्त झाल्या आहेत. या प्रकरणांची सुनावणी १३ सप्टेंबर रोजी ठेवण्यात आली आहे. तसे वाहतूक पोलिसांकडून



सर्व वाहनधारकांना एसएमएस द्वारे संदेश प्राप्त झालेले आहेत. यवतमाळवरून अमरावती येथे चांदुर रेल्वे मार्गे जाणाऱ्या यवतमाळ येथील वाहनांना टार्गेट केल्या जात असल्याचा आरोप वारंवार होतो. यवतमाळ येथील वाहनांना टार्गेट करून अमरावती पोलिसांकडून मोठ्या प्रमाणावर गती अधिक असल्याने दंड आकारण्यात आल्याचेही स्पष्ट झाले आहे. यामुळे यवतमाळच्या नागरिका बाबत भेदभाव होत असल्याची भावना निर्माण झाली आहे. दंडाची ही पद्धत तातडीने थांबवावी, या संदर्भात वेग मर्यादेचा पुनर्विचार करून ती वाढवावी व यवतमाळ जिल्ह्यातील वाहनांवर झालेल्या अन्यायकारक दंड माफ करावा, अशी मागणी वाहनधारकांनी केली आहे. किरकोळ कारणांमुळे देण्यात आलेल्या अशाच चलान दंड प्रकरणी आमदार सत्यजित तांबे यांनी विधानपरिषदेमध्ये २१ मार्च रोजी मांडलेल्या प्रश्नांवर शासनाने या सर्व वाहनधारकांना दिलासा देण्याचे आश्वासन दिले होते. त्याच धर्तीवर यवतमाळ येथील वाहनांना सुद्धा दिलासा देण्यात यावा, अशी मागणी वाहनधारकांनी केली आहे. कित्येक वर्षांपूर्वी जेव्हा रस्ते एकेरी व खडबडीत अवस्थेत होते, तेव्हा वेग मर्यादा निश्चित करण्यात आली होती. मात्र आता रस्ते दुहेरी झाले असून दर्जाही सुधारलेला आहे. अशा परिस्थितीत जुन्या वेग मर्यादेच्या आधारावर दंड करणे ही अन्यायकारक बाब आहे, अशी प्रतिक्रिया यवतमाळातील पीडित वाहनधारक अनिल गायकवाड यांनी दिली.

## धारणी पोलिसांची मोठी कामगिरी

# खुनातील आरोपी अवघ्या चार दिवसांत गजाआड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७धारणी** धारणी पोलीस स्टेशनच्या दक्ष तपास पथकाने अवघ्या चार दिवसांत खुनाचा गुन्हा उघडकीस आणून मुख्य आरोपी यास अटक केली असून प्रथम क्षेणी न्यायाधीशांनी आरोपी यास तिन दिवसाची कोठडी सुनावली आहे.

दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी धारणी शहरातील वार्ड क्र ६ येथे इंद्रलता मोहन जाधव (वय ३६, मूळ रा. प्रितमपूर, म.प्र.) हीचा मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळून आला होता. त्यामुळे धारणी पोलीसांनी घटनास्थळीच भेट देत पंचनाम्यापश्चात तिचा मृतदेह ताब्यात घेवून सदरचा तपास सुरू केला होता.

मृतकीचा मृतदेह संशयास्पद स्थितीत मिळाल्यामूळे तिची हत्या केली असावी असा कयास



करण्यात येत होता. तर दुसरीकडे या पार्श्वभूमीवर धारणी शहरभर नानाविध चर्चेला उधान आले होते. धारणी परिसरात एकच खळबळ उडवून देणाऱ्या या मृत्यूचा उलगडा करणे म्हणजे धारणी पोलीसांपूढे एक फार मोठे आव्हान होते. यादरम्यान धारणी पोलीसांनी शवविच्छेदन आटपून मृत्यूमागील खरे रहस्य व मुख्य आरोपीची धरपकड करण्यासाठी शोधमोहीम हाती घेतली.

पण उत्तरीय तपासणी अहवाल येण्यापूर्वीच धारणी परिसरात महिलेची आत्महत्या नसून ती हत्या असावी असा संशयीत कयास सुरू होता तो अखेर तेवढाच खरा देखील ठरला.इंद्रलता मोहन जाधव हीचा मृत्यू गळा दाबून श्वास गुदमरल्यामुळे झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी हा खून असल्याचा निष्कर्ष काढत तपासाची चक्रे वेगाने फिरवली. व अखेर धारणी पोलीसांनी यासंदर्भात तपास अधिक कसून केला. त्यामुळे तपासी अधिकाऱ्यांना खुनाचा धागा मिळाला.पूर्वी प्राथमिक चौकशीत इंद्रलता मोहन जाधव हिला तिच्या नणंद व इतर नातेवाईकांनी आत्महत्या केली असावी असा संशय व्यक्त केला होता. मात्र धारणीच्या तपासी पथकाने उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरूड यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण तपास अधिकखोलवर नेण्यात आला. त्यामुळे या तपासादरम्यान मृत महिलेचा खून आरोपी गजानन उर्फ गोलू रामसिंग ठाकरे (वय २५, रा. धारणी) यानेच केल्याचे स्पष्ट झाले.अटक पश्चात आरोपी गजानन ऊर्फ गोलू ठाकरे याने तिचा चा खून केल्याची कबूली देखील दिली असून त्याच्याविरुद्ध भा.दं.वि. कलम ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आज दि. २६ ऑगस्ट रोजी त्यास धारणीच्या दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या प्रथम क्षेणी न्यायाधीश यांच्यापूढे हजर करण्यात आले. प्रथम क्षेणी न्यायालयाने आरोपी यास पुढील तिन दिवसाची पोलिस कोठडी सुनावली असून तो पोलिसांच्या कोठडीत आहे पोलीस अधीक्षक विशाल आनंद अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय अधिकारी माधवराव गरूड, पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक सतीश झाल्टे, पोलीस कॉन्स्टेबल सतिश राठौड, पोलीस कॉन्स्टेबल मोहीत आकाशे, पोलीस कॉन्स्टेबल जगत तेलगोटे, सतिश शिंगणे, आदित्य सुरनार व इतर सहकारी पोलीस कर्मचार्यांनी ही संपूर्ण शोधमोहीम राबवून मुख्य आरोपी गजाआड केला. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांच्या मार्गदर्शनात पीएसआय सतीश झाल्टे व त्यांची अधिनस्त चमू करीत आहे.

धारणी पोलिसांच्या या वेगवान कारवाईमुळे परिसरातील जनतेत समाधान व्यक्त होत असून अवघ्या चार दिवसांत खुनातील आरोपीला गजाआड करण्याची कामगिरी धारणी पोलिसांनी मोठ्या शिताफीने बजावली आहे. त्यामुळे संबंधित पोलीस तपास पथकाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## तळेगाव येथील वृद्ध महिलेचा धावत्या बसमध्येच हृदय विकाराने मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७तिवसा** – राज्य परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करणाऱ्या एका वृद्ध महिलेला धावत्या बसमध्येच गुरुकुंज मोझरी जवळ हृदय विकाराचा झटका आल्याने मृत्यू झाला. आज मंगळ सकाळी १० वाजताच्या सुमारास गुरूकुज मोझरी बसस्थानक येथे ही घटना घडली. मंगळवारीप्रमिला ओंकारराव खरबडे (वय ७३, रा. तळेगाव श्यामजीपंत, वर्धा) असे मृतक वृद्ध महिलेचे नाव आहे. धकाधकीच्या आणि बदलत्या जीवनशैलीमुळे अनेक आजार सर्वच वयोगटातील लोकांमध्ये वाढायला लागले आहेत त्यामुळे हृदय विकाराचा धोका वाढला आहे. एसटी बसने प्रवास करणाऱ्या एका महिलेलाही अचानक हृदय विकाराचा झटका आल्याने प्रवासादरम्यान आपले प्राण गमवावे लागले, तळेगाव



शामजीपंत येथून अमरावतीच्या दिशेने प्रवास करीत असताना या महिलेला मृत्यूने कवटाळल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.वृद्ध महिला तळेगाव शामजीपंत येथून नागपूर ते अमरावती–आकोट चक– १४,३८८५ या बस ने प्रवास करीत असताना परिवहन महामंडळाची बस गुरूकुज मोझरी बसस्थानकावर पोहोचताच ही महिला अचानक बेशुद्ध पडल्याने चालक व वाचकाने बस जवळच असलेल्या श्री गुरुदेव आयुर्वेद रुग्णालय येथे आणली. येथील चिकित्सकांनी तपासनी केली असता दरम्यान वृद्ध महिलेला मृत घोषित केले.

# अचलपूर शहरात विकासकामे ठप्पअतिक्रमण हटवूनही झाले नाही नवे बांधकाम, नागरिकांमध्ये नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अचलपूर**

शहरातील नागरिकांच्या मोठ्या अपेक्षांवर पाणी फिरले आहे. काही वर्षांपूर्वी चौधरी मैदान, इंदिरा गांधी मार्केटसारख्या प्रमुख ठिकाणी अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात आली होती. त्या वेळी नागरिकांना आशा होती की येथे भव्य रस्ते, पार्किंगची सोय, सौंदर्दीकरण आणि जनसुविधांची कामे होतील. मात्र सत्तांतरानंतर सर्व योजना व आश्वासने थंडगार पडली असून शहरातील विकास कामे ठप्प झाली आहेत.सुरू असलेली कामेही अधांतरी सध्या शहरातील अनेक रस्त्यांची कामे अपूर्णावस्थेत आहेत. काही ठिकाणी खुदाई करूनच काम बंद केले गेले आहे. त्यामुळे नागरिकांना वाहतुकीत प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे.स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की माजी आमदार बच्चू कडू यांच्या कार्यकाळात शहरात वेगाने विकास झाला होता. कोट्यवधी रुपयांची रस्ते, गटारे, स्ट्रीटलाईट्स व इतर सार्वजनिक कामे पूर्ण झाली होती. मात्र सध्याच्या स्थितीत शहर विकासाच्या आघाडीवरठप्प झालेले आहे. अतिक्रमण हटवणेच मर्यादित कारवाई सध्या प्रशासनाची कारवाई केवळ अतिक्रमण हटवण्या पुरतीच मर्यादित दिसत आहे. ज्या नागरिकांच्या झोपड्या व दुकाने हटविण्यात आली, त्यांना कुठलाही पुनर्वसन दिले गेले नाही. शिवाय त्या ठिकाणी कोणतेही नवे कामसुरू झालेले नाही. यामुळे प्रभावित लोकांमध्ये तीव्र असंतोष आहे. विधानसभा निवडणुकी नंतरही स्थिती जसच्या तशी स्थानिक जनतेला अपेक्षा होती की विधानसभा निवडणुकांनंतर विकासकामांना गती मिळेल. पण महिनोन्महिने उलटून गेल्यानंतरही काहीच बदल झालेला नाही. जनप्रतिनिधी निष्क्रिय आहेत आणि प्रशासनाकडूनही ठोस पावले उचलली जात नाहीत. नागरिकांची मागणी – ठोस विकास आराखडा तयार करावा जागरूक नागरिक व व्यापाऱ्यांनी मागणी केली आहे की नगर परिषद व जिल्हा प्रशासनाने एकत्र येऊन ठोस विकास आराखडा तयार करावा. रिकाम्या पडलेल्या मैदानांचा



वापर जनसुविधांसाठी व्हावा, तुटलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करावी तसेच अधांतरी कामे पूर्ण करावीत.सध्या अचलपूर शहर विकासाच्या ठप्प टप्प्यात अडकलेले आहे. फक्त अतिक्रमण हटवून विकास होत नाही, तर नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन योजनाबद्ध पद्धतीने शहराचा कायापालट करणे गरजेचे आहे. अन्यथा उद्भवणारा जनआक्रोश प्रशासन व जनप्रतिनिधींसाठी मोठे आव्हान ठरू शकतो.

# वाहतूक कोंडीविरुद्ध भाजपा रस्त्यावर

## शहराध्यक्षांनी अधिकार्यांना केल्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती –**
उड्डाणपुलावरील वाहतूक बंद केल्याने उद्भवलेल्या वाहतुकीच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी मंगळवारी भाजपा शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या नेतृत्वात सर्व भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते प्रत्यक्ष पाहणीकरिता रस्त्यावर उतरले व त्यांनी अधिकार्यांना बोलावून वाहतूक सुरळी करण्याच्या सूचना दिल्या.

अमरावती शहराच्या मध्य वस्तीतील अत्यंत व्यस्त अशा राजकमल चौक ते रेल्वे स्टेशन आणि रुक्मिणी नगरकडे जाणारा जुना रेल्वे उड्डाणपूल नादुरुस्त झाला असल्याचा अहवाल आल्यावर प्रशासनाने तडकाफडकी रस्ता बंद करण्याचा निर्णय घेतला. १९६३ मध्ये बांधलेला हा पूल पूर्णतः धोकादायक झालेला असून काही दिवस आधी या पुलावरून पूर्ण जड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आलेली होती; मात्र दोन दिवस आधी प्रशासनाने या पुलावरून आता पूर्णतः दळणवळण बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजेच आता दुचाकी वाहनांना प्रवेश नसणार किंवा पादचारी मार्ग सुद्धा असणार नाही. मात्र गणेशोत्सवाचा सण आहे, पुढे नवदुर्गा उत्सव दसरा आणि दिवाळी सारखे मोठे उत्सव आहेत, अशा ऐन उत्सवाच्या वेळी अमरावतीकरांची प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. रहदारीचा विचार करून वाहतुकीचे नियोजन न केल्याने शहरातील रस्त्यावरील वाहतूक ठप्प झाली आणि त्यामुळे जनतेत तीव्र संतापाची प्रतिक्रिया उमटली. या जनतेच्या समस्येची दखल भाजपा अमरावती शहर अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी घेतली. त्यांनी महापालिका आयुक्त व वाहतूक पोलिस विभागाच्या अधिकार्यांशी बोलून त्यांना प्रत्यक्ष इर्विन चौकात बोलावून घेतले.



उड्डाण पूल नव्याने बनण्यासाठी वेळ लागणार असल्यामुळे तात्पुरता उपाय न करता स्थायी मार्ग काढण्यासाठी डॉ. नितीन धांडे यांनी राजापेठ, राजकमल चौक, जयस्तंभ चौक व सगळ्यात व्यस्त अशा इर्विन चौकाची प्रत्यक्ष पाहणी केली. नंतर इर्विन चौक येथे वाहतुकीचे स्थायी समाधान काढण्यासाठी सहाय्यक पोलिस आयुक्त खाताळे , मनपा उपायुक्त वानखडे, शहर अभियंता रवींद्र पवार, उपअभियंता इंगोले यांच्यासोबत चर्चा करून अनेक सूचना केल्या. या चर्चेनंतर अधिकार्यांनी ताबडतोब वाहतुकीची नवीन योजना तयार करून कार्यान्वित करण्याचे आश्वासन दिले. यावेळी भाजपा अध्यक्षांसोबत प्रा. दिनेश सूर्यवंशी, ललित समदूरकर, बादल कुलकर्णी, राधा कुरील, प्रवीण वैश्य, सुधा तिवारी, विक्की शर्मा, मिलिंद बांबल, राजेश आखेगावकर, विवेक चुटके, श्याम पाध्ये, सविता भागवत, अभिजित वानखडे, प्रफुल्ल बोके, सचिन नाईक, राजेंद्र हजारे, हेमंत श्रीवास्तव, शैलेंद्र मिश्रा, तुषार वानखडे, सुधीर थोरात, संजय आठवले आदी उपस्थित होते.

# मोझरी आयटीआयमध्ये प्रवेशाची पहिली समुपदेशन फेरी पूर्ण

**विदर्भप्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती –**
मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दि. २५ ऑगस्ट रोजी पहिली केंद्रीय समुपदेशन प्रवेश फेरी पार पडली.

सदर प्रवेश फेरी करिता संस्थेचे प्राचार्य आनंद वाळके यांनी प्रवेशप्रक्रिया राबविली. तसेच संस्थेचे गटनिदेशक व शिल्प निदेशक यांनी सुद्धा प्रवेश प्रक्रियेत आपली कामगिरी उत्कृष्टरित्या बजावली.

सुरुवातीला समुपदेशन फेरीमध्ये ५९ प्रवेश निश्चित करण्यात आले. प्रवेशार्थ्यांनी न्यूनतम व्यवसाय सोलर टेक्निशियन तथा इतर व्यवसायामध्ये प्रवेशाकरिता उत्तम प्रतिसाद दिला. केंद्रीय समुपदेशन फेरीत प्रवेश मिळालेला नसलेल्या उमेदवारांसाठी प्रवेशाची अंतिम संधी म्हणजेच संस्थास्तरीय समुपदेशन फेरी दि. २८ ऑगस्ट ते ३१ऑगस्टला राहील.

सदर प्रवेश फेरी करिता प्रशिक्षणार्थ्यांनी दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजेपासून ते दुपारी १२ वाजेपर्यंत संस्थेमध्ये येऊन हजेरी लावायची आहे. त्यानंतर ठीक दुपारी १ वाजता गुणवत्ता यादी प्रदर्शित होऊन गुणवत्ता यादीनुसारच प्रवेश दिले जातील.

प्रवेशाकरिता संस्थेमध्ये सोलर टेक्निशियन, यांत्रिक डिझेल, आरेखक यांत्रिकी, वूडवर्क टेक्निशियन, फॅशन टेक्नॉलॉजी इत्यादी व्यवसायाच्या एकूण ३८ जागा रिक्त आहेत. वरील सर्व व्यवसायाकरिता शासकीय तथा निम शासकीय व खाजगी औद्योगिक आस्थापनेमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. परिसरातील सर्व विद्यार्थ्यांनी या संस्थेत प्रवेश घ्यावा, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य ए. डी. वाळके यांनी केले आहे.

# मराठी विज्ञान परिषदेच्या प्रश्नमंजुषामध्ये अमरावतीचा डंका

## जिल्ह्यातील विद्यार्थिनींनी पटकावली तिन्ही बक्षिस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**
मराठी विज्ञान परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या खगोल प्रश्नमंजुषा स्पर्धेत अमरावती जिल्ह्याचा डंका वाजला असून पहिले तिन्ही पुरस्कार या जिल्ह्याने जिंकले आहेत.

खगोलीय घटनांबाबत समाजात असलेल्या अनेक शंका-कुशंकांचे निरसन होऊन वस्तुनिष्ठ माहिती समाजासमोर यावी, यासाठी मराठी विज्ञान परिषदेतर्फे वेळोवेळी अनेक स्पर्धा घेतल्या जातात. अशीच एक स्पर्धा खगोल प्रश्नमंजुषा नावाने घेण्यात आली. या स्पर्धेचे प्रथम बक्षीस कुमारी श्रावणी गिरी (कमलाबाई टावरी इंग्लिश स्कूल, घुईखेड, ता. चांदूर रेल्वे) हिने पटकावले असून द्वितीय क्रमांक कुमारी यज्ञा डहाके (राजेश्वरी इंग्लिश स्कूल, अमरावती) आणि तृतीय क्रमांक लक्ष राईकवार (शिवाजी आयडियल स्कूल, अमरावती) याने पटकावले आहे.

या प्रश्नमंजुषेत खगोलीय घटनांबद्दल माहिती विचारण्यात आली होती. त्यात बहुतेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. मात्र अचूक आणि महत्वाची माहिती वरील तिघांनी व्यवस्थित पणे पुरवल्यामुळे त्यांना प्रथम तीन बक्षिसे घोषित करण्यात आली. त्यामुळे सदर विद्यार्थी व त्यांच्या शाळांसह मराठी विज्ञान परिषदेच्या स्थानिक शाखेचेही कौतुक केले जात आहे.ही शाखा विदर्भातील महत्वाची शाखा म्हणून ओळखली जाते. येथील पदाधिकाऱ्यांनी मराठी विज्ञान परिषदेचे सर्व उपक्रम अमरावतीत व्यवस्थितपणे राबवले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून असलेल्या या संस्थेचे जाळे दिवसेंदिवस अधिक व्यापक केले जात असून त्याद्वारे वेळोवेळी सभा, संमेलने, शिबिरे तसेच कार्यशाळांचे आयोजन केले जाते. त्यामुळे खगोलीय घटनांबद्दल अमरावती शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात बऱ्यापैकी वातावरण निर्मिती झाली आहे. त्याचेच प्रतिबिंब या निकालात उमटल्याचे संबंधित शाळांमधील शिक्षकांचे म्हणणे आहे.



### चित्रकला स्पर्धेचेही आयोजन

मराठी विज्ञान परिषदेने प्रश्नमंजुषेसोबतच चित्रकला स्पर्धाही घेण्यात आली. स्वर्गीय कुसुमताई सोनार यांच्या स्मृती प्रित्यर्थ घेण्यात आलेल्या या स्पर्धेत १८९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. ही स्पर्धा राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त घेण्यात आली होती. त्यात अकोला, पुणे आणि सातारा येथील विद्यार्थी प्रथम तीन स्थानांवर राहिले.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धा

**विदर्भप्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती–**
हॉकीचे खेळाडू मेजर ध्यानंचद यांचा जन्मदिन दि. २९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. यानिमित्ताने मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त क्रीडा व खेळाचा प्रचार व प्रसार व्हावा, तसेच शहरी व ग्रामीण भागातील नागरीकांपर्यंत क्रीडा व खेळाचे महत्व पोहोचविणे, निरोगी राहण्याचा संदेश, युवक युवतीमध्ये क्रीडा विषयक वातावरण निर्माण व्हावे, क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व जतन व्हावे. यासाठी विविध उपक्रम क्रीडा दिनाच्या निमित्याने आयोजित करण्यात येत आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे क्रीडा स्पर्धा उपक्रमाअंतर्गत दि. २९ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता मॅरेथॉन स्पर्धाचे आयोजन करण्यात येणार आहे. ही मॅरेथॉन जिल्हा क्रीडा संकुल येथून निघून बियाणी चौक, जिल्हाधिकारी



कार्यालय, हायस्कुल चौक. गव्हर्नमेंट गर्ल्स हायस्कुल चौक येथून परत गव्हर्नमेंट गर्ल्स हायस्कुल चौक, जिल्हाधिकारी कार्यालय, बियाणी चौक, जिल्हा क्रीडा संकुल येथे मॅरेथॉनचा समारोप होईल.

मॅरेथॉन स्पर्धा या खुला गट पुरुष व महिला स्वतंत्रप्रमाणे दोन प्रकारात होतील. पुरुष व महिला गटात प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या खेळाडुस ३ हजार, व्दितीय २ हजार, तृतिय १ हजार रोख पारितोषिक, तसेच सर्व सहभागींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी क्रीडा अधिकारी त्रिवेणी बाते मो.नं. ९९७५५९०२३२ यांच्याशी संपर्क साधावा, तसेच खेळाडुंनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले

# सण उत्सव कालावधीत शहरात कलम ३६ लागू

**विदर्भप्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**
जिल्ह्यात आगामी काळात सण उत्सव साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरात पोलीस अधिनियमांतर्गत कलम ३६ लागू झाले आहे.

शहरात श्रीशेणशोत्सव सुरू होणार असून त्यादिवशी अमरावती कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात श्रीची स्थापना करण्यात येणार आहे. तसेच मुस्लीम धर्मियांचा ईद-ए-मिलाद हा सण साजरा करण्यात येणार आहे. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ३६ नुसार सर्व पोलीस आयुक्तालयाच्या परिसरातील सर्व पोलिस ठाणेदार, अंमलदार व त्यांच्यावरील अधिकाऱ्यांना दि. २६ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत अधिकार प्रदान करण्याचे आदेश पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांनी दिले आहे.

रस्त्याने जाणारी मिरवणूक सुरळीत ठेवणे, उपासनास्थळी गर्दी होणार असेल किंवा अडथळ्याचा संभव असेल तर अडथळा होऊ न देणे, सर्व मिरवणूकाच्या व जमावाच्या प्रसंगी व पूजा-अर्चा या ठिकाणी कोणताही रस्ता किंवा अडथळा संभव असेल अशा सर्व बाबतीत अडथळा न होवू देण्यासाठी याठिकाणी बंदोबस्त ठेवणे, सर्व रस्त्यांवर किंवा रस्त्यात, सर्व धाब्यावर आणि सार्वजनिक ठिकाणच्या कपडे धुण्याचा व उतरविण्याचा जागेच्या ठिकाणी व इतर सर्व सार्वजनिक किंवा लोकांच्या येण्याच्या जागेमध्ये बंदोबस्त राहण्यासाठी, वाद्यांबाबत नियम व नियंत्रण ठेवणे, सार्वजनिक जागेत ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत नियम व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. यासाठी हे आदेश देण्यात आले आहे.

# सिंधुताई सपकाळ यांचे स्वप्न पुर्ण करा!- डॉ. कमलताई गवई

## चिखलदऱ्यात आदिवासी मुलींशी साधला भावनिक संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७चिखलदरा–**
मेळघाटातील आदिवासी मुलींना शिक्षित करण्यासाठी पद्मश्री डॉ.सौ. सिंधुताई सपकाळ यांनी १९८० च्या काळात पुढाकार घेतला. आज एवढ्या वर्षात हजारो मुली शिक्षण घेऊन बाहेर पडल्या आहेत. आज तुम्ही मुलींनी खूप खूप शिक्षण घेऊन सिंधुताईंचे स्वप्न पुर्ण केले पाहिजे, असे आवाहन भारताचे सरन्यायाधीश श्री. भूषण गवई यांच्या मातोश्री तथा माजी लेडी गव्हर्नर आचार्य डॉ. कमलताई गवई यांनी केले.

वनवासी गोपालकृष्ण बहुउद्देशीय मंडळ शहापूर (चिखलदरा) द्वारा संचलित सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह चिखलदरा येथे मुलींना मार्गदर्शन करतांना मुख्य अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. आदिवासी मुलींशी संवाद साधताना त्यांनी शिक्षण, आत्मविश्वास आणि चिकाटीचे महत्त्व अधोरेखित केले. आत्मविश्वास, शिक्षण आणि जिद्दीचे महत्व त्यांच्या अनुभवातून सांगितले.परिस्थिती



कितीही कठीण असली तरी स्वप्नांच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे, स्वप्ने लहान नसतात, ती पूर्ण करण्याची ताकद आपल्यातच असते. प
रिस्थिती कठीण असली तरी प्रयत्न कधीच थांबवू नका, असा प्रेरणादायी, आश्वासक व मायेचा संदेश त्यांनी दिला. मुलींनो तुम्ही शिकलात तर आपल्या मेळघाटला लागलेला कुपोषणाचा कलंक दूर होण्यासाठी तुमचे शिक्षण उपयोगी पडेल, तसेच आदिवासिंचा स्तर उंचावण्यास मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माईंच्या अथक परिश्रमातून स्थापन झालेल्या सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींच्या वस्तीगृहात आचार्य डॉ. कमलताई गवई यांच्या रूपाने एक हृदयस्पर्शी क्षण अवतरला, अशी भावना संस्थेचे अध्यक्ष दिपक गायकवाड यांनी व्यक्त केली. संस्थेचे सचिव अरूणभाऊ सपकाळ यांनी माजी राज्यपाल स्व. दादासाहेब गवई यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत कमलताई यांनी संस्थेला भेट दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. संस्थेत कमलताईचे आगमन होताच निरागस चेहऱ्यांवर आनंद ओसंडून वाहू लागला. लहान मुलींनी फुलांच्या गंधासह आपली निरागसता अर्पण करत पुष्पगुच्छ देऊन मातेसमान स्वागत केले.

कमलताईंनीही त्यांना प्रेमळ स्पर्श देत आईची ऊब अनुभवायला लावली. त्यानंतर त्यांनी समाजमाता पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या कार्याला नम्र अभिवादन केले.

कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष दिपक गायकवाड, सचिव अरूणभाऊ सपकाळ, अधिक्षिका सरीता सपकाळ, प्रसाद सपकाळ, जान्हवी सपकाळ, गोपाल गायकवाड, प्रसन्न गायकवाड, जनसंपर्क अधिकारी मुकेश चौधरी यांच्यासह संस्थेतील मुली, कर्मचारी वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी मुलींना खाऊचे वाटप करण्यात आले.

# मावशी 'युसलेस' म्हणाली... तिच्या मुलाचा जीवच घेतला!

**विदर्भप्रजासत्ताक दि. २७** मुंबई – मावशी युसलेस म्हणाली म्हणून तिच्या तीन वर्षीय मुलाचा निर्दयपणे खून करून मृतदेह कुशीनगर एक्स्प्रेसच्या टॉयलेटमधील फ्लश टँकमध्ये लपविणाऱ्या विकासकुमार शाह (३०) याला बीकेसी परिसरातून अटक करण्यात आली. सुरत क्राइम ब्रँच आणि अमरोळी पोलिसांनी ही कारवाई केली. दुबईतील नोकरी गेल्यानंतर विकासकुमार भारतात परतला. नोकरी नसल्याने त्याची मावशी त्याला युसलेस असे टोमणे मारायची. त्यामुळे संतापलेल्या विकासकुमारने तिचा मुलगा आकाश उर्फ आरव याचे अपहरण करून निर्घृण हत्या केली. त्याला या कृत्याबद्दल कोणताही पश्चात्ताप झालेला नाही, असे पोलिसांनी सांगितले. आरोपी दुर्गावती, तिचा पती राजेंद्र यांच्यासोबत अमरोळीतील कृष्णानगर येथे राहात होता. त्याने आकाशला खेळायला चल, असे सांगून बाहेर नेले आणि त्याला मुंबईकडे जाणारी कुशीनगर एक्स्प्रेस पकडली. आकाश टॉयलेटमध्ये नेऊन त्याचा गळा आवळला आणि नंतर गळा चिरून मृतदेह एसी डब्याच्या टॉयलेटमधील फ्लश टँकमध्ये कोंबून तो पसार झाला.

# राज्यातील शाळांच्या रचनेत तीस वर्षांनी मोठा बदल

## गटसाधन केंद्राच्या नावासह केंद्र प्रमुख यांच्यावर विशेष जबाबदारी

**विदर्भप्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**
राज्यातील शाळांच्या रचनेत तब्बल ३० वर्षांनंतर मोठा बदल करण्यात आला आहे. आता प्रत्येक जिल्ह्यात असलेल्या केंद्र शाळा समूह साधन केंद्र या नावाने ओळखल्या जाणार असून, केंद्र प्रमुख या पदाचे नाव समूह साधन केंद्र समन्वयक असे करण्यात आले आहे.

शालेय शिक्षण विभागाने यासंदर्भात शासन निर्णय प्रसिद्ध केला असून, राज्यातील विद्यमान ४ हजार ८६० समूह साधन केंद्रांची पुनर्रचना करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

याशिवाय आणखी १०९ शाळांना समूह साधन केंद्राचा दर्जा देण्यात आला आहे.



### बदलामागील पार्श्वभूमी

१९९४ साली प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी राज्यात केंद्र शाळा स्थापन झाल्या. दहा शाळांमागे एक केंद्रीय शाळा या पद्धतीनुसार त्यावेळी ४,८६० केंद्र शाळा सुरू झाल्या होत्या. त्यांच्याकडून परिसरातील इतर शाळांना मार्गदर्शन करण्याचे काम अपेक्षित होते. मात्र, गेल्या ३० वर्षांत शिक्षण क्षेत्रात झालेल्या बदलांचा विचार करून आणि समग्र शिक्षण योजना तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी ही नवी रचना करण्यात आली आहे.

# शांती वाटिका परिसरात वाईन मार्ट; नागरिकांचा संताप




**परवानगी दिलीच नाही**

सरपंच सौ. कविता अमोल बोरेकर यांनी स्पष्ट केले की, ङ्गबाहुबली वाईन मार्ट सुरू करण्यास ग्रामपंचायतीने कोणतीही परवानगी दिलेली नाही. चुकीच्या पद्धतीने काही सुरू होत असेल तर चौकशी करून आवश्यक ती कारवाई केली जाईल.

**सौ.कविता अमोल बोरेकर (सरपंच)**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अचलपूर**

शांती वाटिका आणि हरगोविंद नगर परिसरातील नागरिकांच्या शांततेला धोका निर्माण करणाऱ्या वाईन मार्टविरोधात स्थानिकांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी न घेता आणि नागरिकांना माहिती न देता बाहुबली वाईन मार्ट सुरू करण्याची तयारी होत असल्याने परिसरातील रहिवासी संतप्त झाले आहेत.परिसरातील नागरिकांनी परतवाडा पोलिस ठाणे व राज्य उत्पादन शुल्क विभाग, अचलपूर यांच्याकडे निवेदन देत, हे दुकान तातडीने अन्यत्र हलवावे अशी मागणी केली.गेल्या २० वर्षांपासून येथे राहणाऱ्या रहिवाशांचे म्हणणे आहे की, या कॉलनीत शाळा, महिला व लहान मुले मोठ्या प्रमाणात आहेत. अशा ठिकाणी वाईन मार्ट सुरू झाल्यास नकारात्मक परिणाम होऊ शकतात तसेच जवळच राष्ट्रीय महामार्ग असल्याने अपघातांचा धोका देखील वाढेल.प्रवीण तनपुरे, अक्षय जवंजाळ, मनोज प्रजापती, यश चौखंडे, गोकुळ कोकरे, शिवाजी तनपुरे, रामेश्वर इंगळे, रुपेश उल्हे, डॉ. गजानन रेवस्कर, नितीन घोम, एड. आर.एस. आठवले, नरेश गौर, राजेंद्र खंदारे, विवेक जंजाळ, जयवंत राऊत, जसवंतसिंग सुरेंद्र ठाकूर, सत्यनारायण अग्रवाल, पूजा अग्रवाल यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक या वेळी उपस्थित होते.स्थानिकांचा ठाम आग्रह आहे की, शांती वाटिका परिसरात वाईन मार्टला परवानगी दिल्यास तेथील सामाजिक वातावरण बिघडेल. त्यामुळे प्रशासनाने तातडीने कारवाई करून हा निर्णय रद्द करावा, अशी मागणी होत आहे

# मनपातील संप स्थगित;सातव्या वेतनातील फरकाची रक्कम मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

गेल्या २० ऑगस्टपासून सुरू असलेला महापालिका कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप आयुक्तांसोबत झालेल्या चर्चेनंतर स्थगित करण्यात आला मंगळवारपासून सर्व संपकर्ते कर्मचारी आपापल्या कामावर परतणार असल्याचे महापालिका कर्मचारी संघटनेचे महासचिव प्रल्हाद कोतवाल यांनी सांगितले.



सातव्या वेतन आयोगातील फरकाची रक्कन एकमुस्त देण्यासह इतर प्रलंबित मागण्यांसाठी महापालिका कर्मचारी संघटनेने २० ऑगस्टपासून बेमुदत संप पुकारला होता आयुक्त सौम्या शर्मा यांनी सोमवारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यासोबत चर्चा केल्यानंतर ही कोडी फुटली

सोमवारी दुपारी आयुक्तांसोबत झालेल्या चर्चेत सातव्या वेतन आयोगातील थकबाकीचा दुसरा देय हाता एकमुस्त दिवाळीपूर्वी देण्यावर प्रशासनाने सहमती दर्शविली

उर्वरित महागाई भत्त्यासह इतर थकबाकी मार्च २०२६ पर्यंत देण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी आश्वासन दिले. आयुक्तांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर बेमुदत संप स्थगित करण्यात येत असल्याचे संघटनेचे महासचिव प्रल्हाद कोतवाल यांनी जाहीर केले.

आयुक्तांसोबत झालेल्या चर्चेदरम्यान संघटनेचे महासचिव प्रल्हाद कोतवाली यांच्यासह मानविराज दंदे, आकाश तिरथकर, विष्णू लांडे, गणेश तबोले उपस्थित होते, तर प्रशासनाकडून आयुक्त सौम्या शर्मा यांच्यासह अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, योगेश पिठे, मुख्य लेखाधिकारी फिस्के, लेखा परीक्षक श्रीदेव उपस्थित होते.

# मागील वर्षीच्या तुलनेत यंदा बाप्पांचे आगमन अकरा दिवस आधी

## आज गणरायांची प्रतिष्ठापना गणेश मंडळे व भक्तगण डीजे, रोषणाई, मिरवणुकीचा खर्च कमी करतील का?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

श्रवणातील धार्मिक सण–समारंभानंतर आता भाद्रपद महिन्यातील सर्वात मोठा आणि लोकप्रिय सण गणेशोत्सव दाराशी आला आहे. यंदा गणेश चतुर्थी अज बुधवार, २७ ऑगस्टला साजरी होत असून मागील वर्षीच्या तुलनेत यंदा बाप्पांचे आगमन ११ दिवस आधीच होत आहे. त्यामुळे तालुक्यातील गणेश मंडळे, भक्तगण आणि बाजारपेठा सज्ज झाल्या असूनसर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे.

गणेश चतुर्थीपासून सुरू होणारा हा उत्सव ११ दिवस चालणार असून, ज्येष्ठागौरीचे विसर्जन २ सप्टेंबरला होईल ६ सप्टेंबर, अनंत चतुर्दशीला गणेश विसर्जन पार पडेल म्हणजेचयदा गणपती बाप्पा ११ दिवस भक्तांच्या घरी मुक्कामी राहून भक्तिभाव, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रमांना नवे ऊर्जास्थान 'देणार आहेतगणपती मंडळांची जय्यत तयारी सध्या सुरु असून गणेशमूर्तींची रूपसज्जा व रंग सजावट करताना मूर्तिकार



बाप्पाच्या मूर्तीवर अंतिम रंगरंगोटी करण्यात मग्न आहेत. ढोल ताशा पथकांचे सराव सुरू झाले असून, सजावटीसाठी लागणारी दुकाने आकर्षक देखावे साकारत आहेत.

शहरातील बाजारपेठा रोषणाई व विविध सजावटीच्या साहित्यांनी खुलून दिसत आहेत. मात्र यंदाचा गणेशोत्सव विशेष सामाजिक भान जपणारा असणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कारण नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीने परिसरातील शेतकरी हवालदिल झाले आहेत. पिकाचे मोठे नुकसान झाल्याने काही शेतकयांच्या हाती ऑंजळभरही धान्य शिल्लक राहिले नाही. अशा स्थितीत गणेश मंडळे व भक्तगण डीजे, रोषणाई,मिरवणुका यांवर होणारा अपव्यय कमी करून त्याऐवजी शेतकऱ्यांना मदतीत्ता हात देतात का? याबाबत उत्सुकता आहे.

गणपती हे संकटमोचक व दुःखनिवारक मानले जातात. त्यामुळे त्यांच्या आगमनावेळी समाजहिताचा विचार करून गणेशोत्सव साधेपणाने साजरा करणे आणि शेतकऱ्यांना दिलासा देणे, हीच खरी बाप्पाला अर्पण केलेली सर्वोत्तम प्रार्थना ठरेल, अशी भावना व्यक्त होत आहे.

# वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत सुरू असणाऱ्या बांधकामांचा बट्ट्याबोळ; निधीअभावी कामे रखडली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२ भातकुली**

भातकुली शहरामध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत आठ कोटी रुपयांच्या विकासकामाचे भूमिपूजन मोठ्या थाटात विद्यमान आ. रवी राणा यांच्याहस्ते करण्यात आले होते. भातकुली शहरातील ही कामे अत्यंत निष्कृष्ट दर्जाची सुरू असून हलक्या दर्जाचे साहित्य या कामांमध्ये वापरण्यात येत आहे. त्यामुळे निधीचा अपव्ययसामान्य नागरिकांच्या डोळ्यादेखतच सुरू आहे

सदर कामे ही सत्ताधाऱ्यांच्या निकटवर्तीयांना देण्यात आली असल्याने या कामाकडे बांधकाम विभागाचा कोणताही अधिकारी फिरकताना दिसून येत नाही. सध्याच्या परिस्थितीमध्ये या कामामुळे प्रत्येक वार्डातील नागरिकांना



मोठा मनस्ताप सुरू असून अनेक प्रभागांमध्ये तर अर्धवट स्थितीत जास्त बांधकाम पडलेले आहे. आतापर्यंत जे बांधकाम करण्यात आलेले आहे, त्या कामांनासुद्धा आता भेगापडल्या आहे, तर काही ठिकाणी रस्त्यांना तहे गेलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये आठ कोटी रुपयांच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेच्या सुरु असणाऱ्या या कामाकडे बांधकाम विभागाकडे नगरपंचायतने अनेक तक्रारी दिल्यानंतर बाधकाम विभागाकडून कुठल्याच प्रकारची दखल घेण्यात आली नाही, हे विशेष. शहरांमध्ये अनेक प्रभागात वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत कामे सुरूहोते. आता तर गेल्या कित्येक दिवसांपासून सदर काम हे बंद आहे.मिळालेल्या माहितीनुसार कंत्राटदारला सदर कामाचे देयक मिळत नसल्यामुळे काम बंद पडले असल्याचे सांगण्यात आले. यामुळेअनेक वार्डामध्ये नागरिकांना मोठा मनस्ताप व त्रास सहन करावा लागत आहे. यावर तत्काळ उपायोजना करावी, अशी मागणी भातकुलीवासी नागरिकांनी केली आहे.

शहरामध्ये सुरू असणाऱ्या बांधकामासंदर्भात नगरपंचायतच्या सभागृहामध्ये वारंवार सभेमध्ये ठराव घेऊन संबंधित विभागाला लेखी तक्रार सादर केल्यानंतरही कुठल्याच प्रकारचे उत्तर त्यांच्याकडून अद्याप मिळाले नसून व कोणती पाहणी त्यांच्या विभागामार्फत करण्यात आली नाही त्यामुळे बांधकाम विभागात राज्यकर्त्यांच्या दावणीला बांधला आहे.

**सोनाली शिंदे, गटनेत्या भातकुली न. प.**

# अभ्यासिकेत १० टक्के जागा राखीव ठेवण्याची मागणी

## आदिवासी युवा क्रांती दलाची एटीसीसोबत चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती :**

शहरातीलआदिवासी विभागाच्यावतीने उभारण्यात आलेल्या अभ्यासिकेमध्ये दहा टक्के जागा वसतिगृह बाह्य आदिवासी मुला–मुलीसाठी राखीव ठेवाव्यात, या मागणीसाठी आदिवासी युवा क्रांती दलाच्या पदाधिकाऱ्यांनी अपर आयुक्त कार्यालयावर धडक दिली. अपर आयुक्त जितेंद्र चौधरी यांना रामेश्वर युवनाते यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने निवेदन दिले. स्पर्धात्मक युगात आदिवासी विद्यार्थी बौध्दिक दृष्टीने सक्षम होणे ही काळाची गरज असल्याने आदिवासी विकास विभागाने आदिवासी विद्यार्थ्यांकरिता शहराच्या मध्यभागी नुकतीच अभ्यासिका सुरू केली आहे. त्याबद्दल संघटनेच्यावतीने अपर आयुक्तांचे कौतुक केले. या अभ्यासिके मध्ये फक्त वसतिगृहातील विद्यार्थ्यांकरिता व्यवस्था करण्यात आली असून, वसतिगृहाव्यतिरिक्त आदिवासी मुले–मुली राहून शहरात शिक्षण घेतात. त्यांनाही या अभ्यासिकेतील दहा टक्के जागा राखीव ठेवाव्यात, अशी मागणी शिष्टमंडळाने रेटून धरली.अपर आयुक्तांसोबत झालेल्या चर्चेच्या वेळी रामेश्वर युवनाते, संजय मसराम, प्रशांत मडावी. लक्ष्मण मरकाम, रामेश्वर उईके, पीयूष पंधरे, शरद कंगाले, अरुण कोडापे, सीमा मरकाम, मंगला युनाते, सुषमा मसराम, हेमलता उईके, सविता मडावी, मोहिनी पंधरे, प्रभा मसरे, संगीला मडावी, पवन उईके, नेहा मसराम, योगेश्वरी युनाले, केतन युनाते, देवेंद्र मडावी, नवल मरकाम, तुषार मसराम, संतोष किरनाके उपस्थित होते.

# १ सप्टेंबरपासून राष्ट्रमाता जिजाऊ अर्बन बँक जनतेच्या सेवेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

शहरातील रुक्मिणीनगर येथील मनपा शाळा क्र.१९ जवळ राष्ट्रमाता जिजाऊ अर्बन को–ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अमरावती (नोंदणी क्र.१५०/२०२५) चे भव्य उद्घाटन १ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान खासदार बळवंत वानखडे भूषवणार असून, आमदार सुलभाताई खोडके या उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अरविंद गांवडे (प्रदेश उपाध्यक्ष, मराठा सेवा संघ), रविंद्र ठाकरे (माहिती आयुक्त, अमरावती खंडपीठ), शंकर कुंभार (जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती), मधुकर मेहकरे (अध्यक्ष, जिजाऊ सृष्टी,



सिंदखेडराजा), सुरेंद्र आडे (जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ, अमरावती) तसेच सिमाताई बोके (प्रदेशाध्यक्ष, जिजाऊ ब्रिगेड, म.रा.) उपस्थित राहणार आहेत.

शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या सोसायटीचा विस्तार होत असून, समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून वित्तीय सेवांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे.

या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन सोसायटीचे अध्यक्ष अश्विन चौधरी, उपाध्यक्ष प्रा. डॉ. प्रफुल्ल गुडधे तसेच संचालक मंडळातील मायाताई गांवडे, प्रकाश राऊत, सुहासिनी अंधारे, मनीष पाटील, हरिभाऊ लुंगे, सिमाताई देशमुख, गजानन टाले, प्रमोद तलवारे, प्रभाकर पाटील, चंद्रकांत मोहिते, शरद बंड, नितीन देशमुख, प्रमोद कापडे यांच्यासह व्यवस्थापक शंशाक साळवे यांनी केले आहे.

# नेरपिंगळाईतील प्राचीन व पुरातन महादेव मंदिराचा होणार कायापालट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नेरपिंगळाई**

स्थानिक एक हजार वर्षे जुने, परंतु काळाच्या ओघात नामशेष होत चाललेल्या महादेव मंदिराच्या भूमिपूजन व गाव्शांतीसाठी महापूजा व फलक उद्द्घाटन सोहळा असंख्य नागरिकांच्या व महिलांच्या उपस्थितीत नुकताच पार पडला.



या कार्यक्रमाला श्री. श्री. १००८ पवित्रा नंदगिरी महामंडलेश्वर, महाकाल मंदिर उज्जैन, श्री. शिवशंकर स्वामी मठाधिपती, श्री गुरु गंगाधर स्वामी मठ, प्रमोद गिरी महाराज शिवशक्ती उपासक, शिरजगाव बंड यांच्याहस्ते भूमीपूजन व फलक उद्घाटन करण्यात आले.यावेळी सरपंचा सविता खोडसकर, उपसरपंच मंगेश अडणे, ग्रामसेवक विनोद मनवर, गावातील नागरिक तसेच सर्व मंदिराचे व गणपती मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी, गावातील महिला भजन मंडळे मोठ्या संख्येने उपस्थित होते.गावातील काही होतकरू तरुणांनी एकत्र येऊन अतिशय भव्य महादेव मंदिर निर्माण करण्याचा संकल्प केलेला आहे. दसऱ्यानंतर मंदिराच्या बांधकामाला सुरुवात होणार आहे. सर्व महादेव भक्त, भगिनींना तन–मन–धनाने सहकार्य करावे, अशी विनंती विश्वस्त अरुण पातुरकर, विलास क्षीरसागर, अरविंद पोटे, राजू लोचन, दिनेश माहोरे आणि रामभाऊ माकोडे यांनी केलेली आहे.

# श्री हव्याप्र मंडळाच्या पुरुष जलतरण संघाला रजत पदक; राज्यस्तरीय ज्युनिअर वॉटरपोलो स्पर्धेत यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

पुणे (बालेवाडी) येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय ज्युनिअर वॉटरपोलो स्पर्धेत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरणपटूंनी नेत्रदीपक कामगिरी केली. या स्पर्धेत पुरुष संघाने, पुणे, मुंबई, रायगड, नागपूर, वर्धा या संघाचा पराभव करीत रजतपदक पटाकाविले.या संघाचे



प्रशिक्षक म्हणून मंडळाच्या जलतरण विभागाचे प्रमुख, एनआयएस प्रशिक्षक प्रा. डॉ. योगेश निमर्ळ यांनी भूमिकाबजावली. या यशाचे श्रेय पुरुष संघाने मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, उपाध्यक्ष श्रीकांत चेंडके, अमरावती जलतरण संघटनेचे अध्यक्ष वसंतराव हरणे, प्रा. डॉ. टॉमी जोश, प्रा. डॉ. लक्ष्मीकात खंडागळे, प्रशिक्षक प्रा. डॉ. योगेशनिमर्ळ, मयूर कुमार, वैभवी थेटे, पार्थ अंबुलकर यांना दिले. या यशाबद्दल मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. खांडेकर, सचिव डॉ. विकास कोळेश्वर, जनसंपर्क अधिकारी अजय दुपारे यांनी जलतरणपटूंचे स्वागत केले.

# ‘गणपती बाप्पा मोरया.....!



नेहरू मैदान, सायन्सस्कोर मैदान आणि राजापेठ परिसरात गणेश मूर्ती विक्रीसाठी उभारण्यात आलेले स्टॉल कालपासून गजबजले होते. सकाळपासूनच भाविकांनी आपल्या आवडत्या गणरायाला घरी आणण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली. विशेषतः मातीच्या मूर्तींच्या खरेदीकडे लोकांचा ओढा अधिक दिसून आला. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याची जनजागृती झाल्यामुळे मातीच्या गणपतींना यंदा चांगला प्रतिसाद मिळाला.

# बाप्पांचे मोदक, खिरापत महागले

## ऐन सणासुदीत ग्राहकांना महागाईचा ‘नारळ’

### प्रसाद, देवपूजा, मिठाई, मोदक या पदार्थांसाठी नारळ खोबऱ्याची मोठी मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

दक्षिणेतील राज्यात पावसाळ्यात उष्णता वाढल्यानं नारळ खराब होत त्यांना कीड लागली. त्यामुळं यंदा नारळाची आवक कमी झाली आहे. परिणामी, गणेशोत्सवामुळं नारळाची मागणी जास्त आणि आवक कमी असल्यानं नारळाचे भाव दहा ते पंधरा रुपयांनी वाढले आहेत. तसंच सुके खोबऱ्यांची किंमत ४०० रुपये किलोपर्यंत गेल्यानं गणेशोत्सवाच्या तोंडावर ग्राहकांना महागाईचा फटका बसत आहे.



सणासुदीत प्रसाद, देवपूजा, मिठाई, मोदक या पदार्थांसाठी नारळ खोबऱ्याची मोठी मागणी असते. मात्र, यंदा दक्षिणोत्तर राज्यामध्ये पावसाळ्यात उष्णता वाढल्यानं नारळांना कीड लागली. जिथं एका झाडावर १०० नारळ येत होते, तिथं केवळ ५५ ते ६० नारळं मिळाली असल्यानं नारळाची आवक घटली आहे. त्यामुळं नारळ, खोबरे,खोबरा किस छे भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. ३० ते ३५ रुपयांचे नारळ आता ४० ते ४५ रुपये तर घरामध्ये वापरले जाणारे सुके खोबरे चारशे रुपये किलोपर्यंत पोहचले आहे. खोबरेल तेलही दुप्पटीनं महाग झालं आहे. भाजीसाठी लागणाऱ्या शेंगदाणा तेलापासून खोबरेल तेल दुप्पटीनं महाग झाले आहे. अडीचशे ग्रॅम खोबरेल तेलाची बाटली तब्बल १९२ रुपयांना मिळत आहे. गणेशोत्सव जवळ आल्यामुळं नागरिकांना नारळ, सुके खोबरे आणि खोबरेल तेल चढ्या भावानं विकत घ्यावं लागत आहे.

आजपासून गणेशोत्सवाला सुरूवात झाली आहे या दिवसात गौरी-गणपतीला खिरापतीचा प्रसाद दिला जातो. परंतु महत्त्वाच्या सणात नारळ महाग झाल्यानं खोबऱ्याचा कीस ६०० ते ६५० रुपये किलो मिळण्याचा अंदाज नारळ व्यावसायिकांनी व्यक्त केला आहे. यासोबतच मिठाईत देखील नारळाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. मात्र, नारळ महागल्यानं नारळाचे मोदक, लाडू आणि मिठाईदेखील महाग झाली आहे.

शहरात केरळ, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू या भागातून दररोज साधारण ६० हजार नारळाची आवक होते. मागील दोन महिन्यापासून नारळ आणि खोबऱ्याचे दर सातत्यानं वाढत आहेत. त्यामुळं ग्राहकांकडून मागणी देखील २० टक्क्यानं कमी झाली आहे. दिवाळीपर्यंत दक्षिणोत्तर भागात नव्यानं नारळाचे पीक आल्यानंतर भाव कमी होईल, अशी आशा असल्याचं नारळ व्यावसायिकानी सांगितले.

# हिंदूंच्या सणाला विघ्न नको - नवनीत राणा यांचा जरांगे पाटलांना सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

मराठा आरक्षणासाठी आरपारची लढाई लढण्यासाठी मनोज जरांगे पाटील जालनामधून मुंबईच्या दिशेने कूच केली आहे. गणेशोत्सवाचे सर्वत्र उत्साहाचं वातावरण असतानाच, जरांगे पाटलांनी मुंबईच्या दिशेने रवाना झाल्याने राज्यातील सरकारने वेगवान हालचाली सुरू केल्या आहेत.

यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. अमरावतीमधील भाजपच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी यावर प्रतिक्रिया देताना, 'हिंदूच्या सणाला विघ्न नको, जरांगे पाटलांनी न्यायालयाच्या आदेशाचं पालन केले पाहिजे,' असे म्हटलं आहे.



नवनीत राणा यांनी आरक्षणासाठी मुंबईकडे निघालेल्या जरांगे पाटील भूमिकेवर प्रतिक्रिया देताना, ‘न्यायालयावर सर्वांचा विश्वास आहे. न्यायालयाच्या आदेशाचं पालन सर्वांनी केलं पाहिजे. गणेशोत्सव हिंदूंचा मोठा सण आहे. महाराष्ट्रात खूप उत्साहाचं वातावरण असून, तो महाराष्ट्रात अतिशय भक्तीभावानं सर्वत्र साजरा केला जात आहे. मुंबईमध्ये पूर्ण देशाचे लोक लालबागच्या राजाचं दर्शन घेण्यासाठी येतात. या ठिकाणी खूप गर्दी उत्साह असतो. त्यामुळे हे ११ दिवस सोडून, परत आपल्या मागणी रोडवर आणू शकता.

११ दिवस आपले सण आहेत. यामध्ये कुठले प्रकारे विघ्न न टाकता, ११ दिवसानंतर मागणी करू शकता, असे सांगताना कोण हिंदुत्ववादी आहे हे कोणी ठरू शकत नाही. हिंदूच्या सणाला विघ्न आलं नाही पाहिजे,’ असेही माजी खासदार नवनीत राणा यांनी म्हटलं आहे.

# हरिश्चंद्र पाटलांच्या मातीच्या गणपतीला ३७५ वर्षांची परंपरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

दरवर्षी मातीच्या मूर्तीची स्थापना, दहा दिवसांचा थाटामाटात साजरा होणारा गणेशोत्सव आणि चतुर्दशीला विसर्जन ही गणेशोत्सवाची सर्वसाधारण पद्धत.पण अमरावतीतील तारखेडा भागात असलेल्या पाटलाच्या वाड्यातील देशमुख कुटुंब गेल्या ३७५ वर्षांपासून एक आगळीवेगळी परंपरा जपत आहे. येथे दरवर्षी मातीची मूर्ती तयार केली जाते. गणेश चतुर्थीला तिची स्थापना होते, आणि पुढील वर्षीच्या गणेशोत्सवापर्यंत ही मूर्ती वर्षभर मंदिरात पूजेसाठी ठेवली जाते. त्यानंतर, गणेश चतुर्दशीला तिचा विसर्जन समारंभ पार पडतो. यावर्षी तयार होणारी मूर्ती पुढील वर्षभर मंदिरात विराजमान राहणार आहे.



**मंदिरातील गणपतीच्या स्थापनेची कहाणी**

सन १६४० ते १६४५ दरम्यान गुजरातहून एक संत मुनी महाराज तारखेडा परिसरात आले होते. त्यावेळी देशमुख आणि पाटील अशा दोन्ही पदव्या धारण करणाऱ्या देशमुख कुटुंबाच्या पाटलाच्या वाड्यात ते नेहमी येत असत आणि हळूहळू त्यांनी तिथेच वास्तव्य केले. याच काळात, त्यांनी कुटुंबाला गणेश चतुर्थीला मातीचा गणपती बनवून त्याची स्थापना करायला सांगितले आणि चतुर्दशीला त्याच ठिकाणी त्याचे विसर्जन करण्याचे निर्देश दिले. विशेष म्हणजे, त्यांनी स्पष्ट केले की ही मूर्ती कुटुंबातील सदस्यानेच तयार करायला हवी.

या परंपरेची सुरुवात १६५० मध्ये झाली, जेव्हा विक्रम देशमुख यांनी मातीची पहिली मूर्ती घडवली. तेव्हापासून देशमुख कुटुंब ही परंपरा पिढ्यानपिढ्या पुढे नेत आहे, सध्या श्याम देशमुख हे मूर्तिकाम सांभाळत आहेत.

सुरुवातीच्या काळात गणपतीची मूर्ती खूप लहान आकाराची असायची. १८५० नंतर, हरिश्चंद्र पाटील यांनी पहिल्यांदाच पाच फुटांची मूर्ती तयार केली. या मोठ्या मूर्तीमुळे अमरावती शहरात या गणपतीची सर्वत्र चर्चा झाली आणि हा ‘हरिश्चंद्र पाटलांचा गणपती’ म्हणून ओळखला जाऊ लागला.

पाटलाच्या वाड्यातील गणपती मंदिर देशमुख कुटुंबाचे खासगी असले, तरी ते सर्व भाविकांसाठी खुले असते. गणेशोत्सवाच्या काळात येथे मोठा महाप्रसाद असतो, दररोज रात्री भजन होते आणि परिसरातील सर्व लोक या उत्सवात सहभागी होतात. त्यामुळे, हे मंदिर खासगी असले तरी इथला दहा दिवसांचा गणेशोत्सव पूर्णपणे सार्वजनिक स्वरूपाचा असतो.

# ‘गंगा सावित्री’ वर बाप्पाच थाटात आगमन .....



भाजपा नेत्या आणी अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांच्या अमरावतीच्या शंकर नगर निवासस्थानी गणपती बाप्पाचे थाटात वाजत गाजत आगमन झाले, लाडक्या गणपती बाप्पाची यावेळी सुनील राणा यांनी पूजा,अर्चना, आरती केली यावेळी घरात अतिशय आनंदाच उत्साहाच वातावरण असतं.. गणपती बाप्पा सगळ्यांचा सुख समाधान ठेवेल विघ्न दूर करेल तर केंद्र व राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे त्यामुळे शेतकऱ्याला सरकार मदत करेल अशी ग्वाही नवनीत राणा यांनी यावेळी दिली.

# २.८४ लाख शेतकऱ्यांना लाभ; मात्र सात हजार अजूनही प्रतीक्षेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत २०व्या हप्त्याचे दोन हजार रुपये जिल्ह्यातील २.८४ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. मात्र तांत्रिक अडचणी व अपूर्ण कागदपत्रांमुळे तब्बल सात हजार शेतकरी पहिल्याच हप्त्यापासून वंचित असल्याची माहिती समोर आली आहे.

जिल्ह्यात २,९२,८७३ शेतकऱ्यांनी पीएम किसान योजनेसाठी नोंदणी केली असून त्यापैकी २,८४,९७४ शेतकऱ्यांनी ई-केवायसी पूर्ण केल्यामुळे त्यांच्या खात्यात आतापर्यंत २० हप्त्यांमधून ४० हजार रुपयांची थेट जमा झाली आहे. २१ व्या हप्त्यासाठी आता ‘फार्मर आयडी’ अनिवार्य करण्यात आले असून शेतकऱ्यांनी यासाठी आवश्यक प्रक्रिया करावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.अनुदान न मिळण्याची मुख्य कारणे म्हणजे ई-केवायसी न करणे, आधार क्रमांक व बँक खात्यात तफावत असणे, चुकीची नोंद, जमीन धारकत्वातील विसंगती तसेच फार्मर आयडीची नोंद नसणे, अशी आहेत.प्रशासनाने शेतकऱ्यांना किसान पोर्टलवर लॉगिन करून आपला हप्ता स्टेटस तपासण्याचे आवाहन केले आहे. तसेच बँक खाते व आधार क्रमांकाची पडताळणी करून कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही सांगितले आहे.



# जिल्हा परिषद, पंचायत समिती आरक्षणाचा नवीन फॉर्म्युला

## राखीव जागा आणि चक्रानुसार होणार आरक्षण सोडत; अधिसूचना जारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती गट-गणांमध्ये आरक्षण ठरविण्यासाठी नवे नियम लागू केले आहेत. यासंदर्भात अधिसूचना ग्रामविकास विभागामार्फत जाहीर करण्यात आली आहे. राखीव जागा आणि चक्रानुसार आरक्षणाची सोडत काढली जाणार असून यापुढे निवडणुका त्याच पद्धतीने पार पडतील.

राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समित्यांची मुदत संपुष्टात आली आहे. यावेळी होणाऱ्या निवडणुकांसाठी आरक्षणाच्या प्रक्रियेबाबत स्पष्टता करण्यात आली आहे. न्यायालयीन वादामुळे पूर्वी आरक्षण ठरविण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे राज्य शासनाने नव्या नियमानुसार आरक्षणाचा फॉर्म्युला निश्चित केला आहे. मागील निवडणुकांमध्ये ज्याठिकाणी जागा राखीव होत्या, त्या ठिकाणीच टप्प्याटप्प्याने आरक्षण दिले जाणार आहे. परंतु, आता सर्कलमधील लोकसंख्येच्या प्रमाणानुसार अनुसूचित जाती-जमातींना आरक्षणाच्या टक्केवारीनुसार वाटप केले जाणार आहे. सन २००२ प्रमाणे नव्याने आरक्षण काढले जाणार आहे. यामध्ये प्रत्येक गट-गणामध्ये ठराविक टक्केवारीनुसार महिला आरक्षणाची अंमलबजावणी केली जाईल. आरक्षण ठरविताना जिल्हा परिषद गट आणि पंचायत समित्यांच्या गणामध्ये बदल होणार आहे.




यामध्ये लोकसंख्येचा आधार घेतला जाणार असल्याने काही ठिकाणी राखीव जागांमध्ये फेरबदल होऊ शकतो. अनुसूचित जाती-जमातींच्या प्रतिनिधित्वाला न्याय मिळेल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. ग्रामविकास विभागाने अधिसूचना काढल्यैसे आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. या नव्या फॉर्म्युल्यामुळे आता गुडघ्याला बाशिंग बांधून असलेल्या इच्छुकांना फटका बसण्याची शक्यता आहे.

# अंजनगाव तालुक्यात गुंतवणूकदारांना कोटी रुपयांचा गंडा बसण्याची शक्यता?

## ठकेबाजाने पैसे दुप्पट होण्याची लालुच देऊन कोटी रुपये केले जमा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यात पैशाचा महा घोटाळा होत असल्याची चर्चा होत आहे.पैसे दुप्पट करण्याचे फसवे आमिष दाखवून लाखो लोकांना लुटण्याचे प्रकार अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहेत. सुरुवातीला ह्या कंपन्या गुंतवणूकदारांना अनेक वर्षे खरोखरच नफा देऊन गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करण्यात येते हळूहळू गुंतवणूकदारांची संख्या वाढतच जाते आणि काही वर्षे लोटले की कंपनी गायब होते मात्र यात अनेकांना लाखो रुपयांचा गंडा बसतो.अशाच एका फसव्या संत्रा व्यापाऱ्याने अंजनगाव सुर्जीसह आजूबाजूच्या अनेक जिल्ह्यांमध्ये लोकांना लुबाडून त्यांना पैसे डबल करतो, असे आमिष देत कोटींचा महाघोटाळा केला असल्याचे बोलल्या जात आहे . प्रविण्य नामक व्यापाऱ्यांने आपल्या नातेवाईक आणि मित्रमंडळींच्या मदतीने एका धार्मिक पंथातील संन्याशी असलेल्या बुवाजी महाराजासह इतर शेकडो लोकांना लुबाडले आहे. या ठगांच्या मागे लागून अनेकांनी आपल्या वर्षानुवर्षे साठवलेल्या अनेकांना पैशांवर पाणी सोडण्याची पाळी आली आहे.हा ठकेबाज तालुक्यातील सदन शेतकरी असून संत्रा व्यापारी आहे तर वडीलांनी एका पंथात दिक्षा घेतली आहे यामुळे या ठकेबाजाचा राजकीय व धार्मिक वलय असल्याने चांगलाच ओळख परिचय सर्वच समाजात असल्याने या ठेकेबाजावर साध्या भोळ्या गुंतवणूकदारांनी विश्वास ठेवून लाखो रुपये गुंतवले आहेत.यात शेतमजुरा पासून ते सदन शेतकऱ्यांपर्यंत दुप्पट पैसेच्या लालचे पोटी गुंतवणूकदार बळी पडले आहे. हा कोटी रुपयांचा घोटाळा करण्यासाठी परजिल्ह्यातून ठकेबाजचा आका सूत्र हलवत असून तो आका या ठकेबाजचा जवाई असल्याचे समजते. प्रविण्य नावाच्या ठकेबाजाने लाखो रुपये घेऊन गुंतवणूकदारांना कोणतीही रितसर पावती न देता फक्त एका बॅकेचा प्रत्येक गुंतवणूकदारांना चेक दिला आहे. काही गुंतवणूकदार पैसे काढण्यासाठी ठकेबाजा जवळ गेले असता इन्कमटॅक्स ची रेट पडल्यामुळे काही दिवस पैसे मिळत नाहीत असे गुंतवणूकदारांना सांगत असल्याने गुंतवणूकदारांची मात्र झोप उडाली असून गुंतवणूकदारांमध्ये भीती व घबराट पसरली आहे.